**महत्वाचे पत्र**

क्र.कृआआ-२०१६/सुसिंयो/प्र.मं.कृ.सिं.यो./प्र.मा./प्र.क्र.२५/७९४/फलो-४
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५,दि.३०/८/२०१६

**प्रति,**

**विभागिय कृषि सहसंचालक, (सर्व)**

**विषय :-** **प्रधान मंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत(PMKSY) -** केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना २०१६-१७ मध्ये राज्यात राबविण्याकरीता मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याबाबत..

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र.प्र.कृ.सिं-२११६/प्र.क्र.१४०/४ -अे,दि.१२ ऑगस्ट २०१६

राज्यात प्रधान मंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत(PMKSY) केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना सन २०१६-१७ मध्ये राबविण्यासाठी केंद्र शासनाने रू.२५०.०० कोटी रक्कम निर्धारीत केलेली होती.त्याअनुषंगाने केंद्र व राज्य हिस्सा प्रमाण विचारात घेऊन एकूण रु.४०८.३३ कोटी(केंद्र हिस्सा रु.२५०.०० कोटी व राज्य हिस्सा रु.१५८.३३ कोटी)रकमेचा वार्षिक कृति आराखडा केंद्र शासनास व राज्य शासनास सादर करण्यात आलेला होता. त्यास राज्य शासनाने संदर्भिय शासननिर्णयाव्दारे सन २०१६-१७ मध्ये प्रधान मंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत(PMKSY)केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी रू.४०८.३३ कोटी रकमेच्या वार्षिक कृति आराखड्यास प्रशासकिय मान्यता दिलेली आहे. राज्य शासनाकडील दि.१२ ऑगस्ट २०१६ रोजीचा शासन निर्णयध्ये नमूद बाबींच्या अधिन राहून प्रधान मंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत (PMKSY) केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना २०१६-१७ मध्ये राज्यात राबविण्याकरीता क्षेत्रिय स्तरावर मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत. तसेच या योजनेसाठीचा जिल्हानिहाय वार्षिक कृति आराखडा सोबत सहपत्रित केला आहे. सन २०१६-१७ मध्ये उपलब्ध निधीच्या मर्यादेत पूर्वसंमती देण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.

सदर सुचना आपलेस्तरावरुन आपले अधिनस्तच्या सर्व क्षेत्रिय अधिकारी / कर्मचा-यांच्या निदर्शनास आणाव्यात आणि त्यानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. योजनेच्या अंमलबजावणी व सनियंत्रणाची संपूर्ण जबाबदारी आपली राहिल.

**सोबत - वरीलप्रमाणे**

**संचालक,फलोत्पादन**
**कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,**

**प्रत -**

१) मा.अपर मुख्य सचिव, कृषि व पदुम विभाग मंत्रालय,मुबई-३२ यांना माहितीस्तव सादर.
२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,(सर्व)माहितीस्तव व पुढील योग्य कार्यवाहीस्तव

## प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना- वार्षिक कृति आराखडा २०१६-१७

(रु. लाखात)

| अ. क्र. | जिल्हा | जिल्हातील अनुसुचित जातीचे लोक संख्येतील प्रमाण (%) | जिल्हातील अनुसुचित जमातीचे लोक संख्येतील प्रमाण (%) | २०१६-१७ साठी आर्थिक तरतुद | | | सामाजिक प्रवर्ग निहाय निधीची विगतवारी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | केंद्र हिस्सा निधी | राज्य हिस्सा निधी | एकुण | अनुसुचित जाती | अनुसुचित जमाती | सर्वसाधारण | एकुण |
| १ | ठाणे | ६.६० | १३.९० | १०.५१ | ६.६४ | १७.१५ | १.१३ | २.३८ | १३.६३ | १७.१५ |
| २ | पालघर | NA | NA | १७.१२ | १०.८४ | २७.९६ | ०.०० | ५.०० | २२.९६ | २७.९६ |
| ३ | रायगड | ५.१० | ११.६० | १०.१५ | ६.४३ | १६.५८ | ०.८५ | १.९२ | १३.८१ | १६.५८ |
| ४ | रत्नागीरी | ४.१० | १.३० | ३६.३० | २२.९९ | ५९.२९ | २.४३ | ०.७७ | ५६.०९ | ५९.२९ |
| ५ | सिंधुदूर्ग | ६.५० | ०.८० | ७.२० | ४.५६ | ११.७६ | ०.७६ | ०.०९ | १०.९० | ११.७६ |
| ठाणे विभाग | | | | ८१.२८ | ५१.४५ | १३२.७३ | ५.१७ | १०.१७ | ११७.३९ | १३२.७३ |
| ६ | नाशिक | ९.१० | २५.६० | १२३९.०१ | ७८४.६५ | २०२३.६६ | १८४.१५ | ५१८.०६ | १३२१.४५ | २०२३.६६ |
| ७ | धुळे | ६.२० | ३१.६० | ८६७.७७ | ५४९.५५ | १४१७.३२ | ८७.८७ | ४४७.८७ | ८८१.५८ | १४१७.३२ |
| ८ | नंदुरबार | २.९० | ६९.३० | ३६२.५७ | २२९.६१ | ५९२.१८ | १७.१७ | ४१०.३८ | १६४.६३ | ५९२.१८ |
| ९ | जळगाव | ९.२० | १४.३० | २६१४.४६ | १६५६.६० | ४२७१.०६ | १९६.९० | ६१०.७६ | ३४६३.४० | ४२७१.०६ |
| नाशिक विभाग | | | | ५०८३.८१ | ३२२०.४२ | ८३०४.२३ | ४८६.१० | १९८७.०८ | ५८३१.०५ | ८३०४.२३ |
| १० | अहमदनगर | १२.६० | ८.३० | १३८९.०८ | ८७९.६९ | २२६८.७७ | २८५.८७ | १८८.३१ | १७९४.६० | २२६८.७७ |
| ११ | पुणे | १२.५० | ३.७० | ८५१.२१ | ५३९.०७ | १३९०.२८ | १७३.७८ | ५१.४४ | ११६५.०५ | १३९०.२८ |
| १२ | सोलापूर | १५.०० | १.८० | १८००.७८ | ११३९.५९ | २९४०.३७ | ४४१.०६ | ५२.९३ | २४४६.३९ | २९४०.३७ |
| पुणे विभाग | | | | ४०४१.०७ | २५५८.३५ | ६५९९.४२ | ९००.७१ | २९२.६८ | ५४०६.०४ | ६५९९.४२ |
| १३ | सांगली | १२.५० | ०.६० | ८२५.८८ | ५२३.०२ | १३४८.९० | १६८.६१ | ८.०९ | ११७२.११ | १३४८.९० |
| १४ | सातारा | १०.८० | १.०० | ७५६.४८ | ४७९.०७ | १२३५.५५ | १३३.४४ | १२.३६ | १०८९.७६ | १२३५.५५ |
| १५ | कोल्हापूर | १३.०० | ०.८० | ४१०.७२ | २६०.११ | ६७०.८३ | ८७.२१ | ५.३७ | ५७८.२५ | ६७०.८३ |
| कोल्हापूर विभाग | | | | १९९३.०८ | १२६२.२० | ३२५५.२८ | ३८९.२६ | २५.८२ | २८४०.२० | ३२५५.२८ |
| १६ | औरंगाबाद | १४.६० | ३.९० | ९३५.१६ | ५९२.२३ | १५२७.३९ | २२३.०० | ५९.५७ | १२४४.८२ | १५२७.३९ |
| १७ | जालना | १३.९० | २.२० | ९४०.२६ | ५९५.४६ | १५३५.७२ | २१३.४७ | ३३.७९ | १२८८.४७ | १५३५.७२ |
| १८ | बीड | १३.६० | १.३० | ९३५.३० | ५९२.३२ | १५२७.६२ | २०७.७६ | १९.८६ | १३००.०० | १५२७.६२ |
| औरंगाबाद विभाग | | | | २८१०.७२ | १७८०.०१ | ४५९०.७३ | ६४४.२२ | ११३.२१ | ३८३३.२९ | ४५९०.७३ |
| १९ | लातूर | १९.६० | २.३० | १६८३.६४ | १०६६.२३ | २७४९.८७ | ५३८.९८ | ६३.२५ | २१४७.६५ | २७४९.८७ |
| २० | उस्मानाबाद | १६.०० | २.२० | ३७३.३९ | २३६.४७ | ६०९.८६ | ९७.५८ | १३.४२ | ४९८.८६ | ६०९.८६ |
| २१ | नांदेड | १९.१० | ८.४० | ५०६.५० | ३२०.७६ | ८२७.२६ | १५८.०१ | ६९.४९ | ५९९.७६ | ८२७.२६ |
| २२ | परभणी | १३.५० | २.२० | ७८८.६२ | ४९९.४३ | १२८८.०५ | १७३.८९ | २८.३४ | १०८५.८२ | १२८८.०५ |
| २३ | हिंगोली | १५.५० | ९.५० | ७३४.७१ | ४६५.२९ | १२००.०० | १८६.०० | ११४.०० | ९००.०० | १२००.०० |
| लातूर विभाग | | | | ४०८६.८६ | २५८८.१७ | ६६७५.०३ | ११५४.४४ | २८८.४९ | ५२३२.१० | ६६७५.०३ |
| २४ | अमरावती | १७.५० | १४.०० | ७८०.७४ | ४९४.४३ | १२७५.१७ | २२३.१६ | १७८.५२ | ८७३.४९ | १२७५.१७ |
| २५ | बुलडाणा | १८.२० | ४.८० | २१३४.३३ | १३५१.६५ | ३४८५.९८ | ६३४.४५ | १६७.३३ | २६८४.२१ | ३४८५.९८ |
| २६ | अकोला | २०.१० | ५.५० | ५९६.०४ | ३७७.४७ | ९७३.५१ | १९५.६७ | ५३.५४ | ७२४.२९ | ९७३.५१ |
| २७ | वाशीम | १९.२० | ६.७० | ६१३.६३ | ३८८.६१ | १००२.२४ | १९२.४३ | ६७.१५ | ७४२.६६ | १००२.२४ |
| २८ | यवतमाळ | ११.८० | १८.५० | ९२३.११ | ५८४.६० | १५०७.७१ | १७७.९१ | २७८.९३ | १०५०.८७ | १५०७.७१ |
| एकूण | | | | ५०४७.८५ | ३१९६.७६ | ८२४४.६१ | १४२३.६२ | ७४५.४७ | ६०७५.५२ | ८२४४.६१ |
| २९ | नागपूर | १८.६० | ९.४० | ७८८.१५ | ४९९.१३ | १२८७.२८ | २३९.४३ | १२१.०० | ९२६.८४ | १२८७.२८ |
| ३० | वर्धा | १४.५० | ११.५० | ७८०.९५ | ४९४.५७ | १२७५.५२ | १८४.९५ | १४६.६८ | ९४३.८८ | १२७५.५२ |
| ३१ | चंद्रपुर | १५.८० | १७.७० | १०८.४७ | ६८.६९ | १७७.१६ | २७.९९ | ३१.३६ | ११७.८१ | १७७.१६ |
| ३२ | भंडारा | १६.७० | ७.४० | ९०.४६ | ५७.२९ | १४७.७५ | २४.६७ | १०.९३ | ११२.१४ | १४७.७५ |
| ३३ | गोंदीया | १३.३० | १६.२० | ४१.०२ | २६.९८ | ६८.०० | ९.०४ | ११.०२ | ४७.९४ | ६८.०० |
| ३४ | गडचिरोली | ११.३० | ३८.७० | ४६.२८ | २९.३१ | ७५.५९ | ८.५४ | २९.२५ | ३७.७९ | ७५.५९ |
| एकूण | | | | १८५५.३३ | ११७५.९६ | ३०३१.२९ | ४९४.६३ | ३५०.२५ | २१८६.४१ | ३०३१.२९ |
| राज्य एकुण | | | | २५०००.०० | १५८३३.३३ | ४०८३३.३३ | ५४९८.१६ | ३८१३.१६ | ३१५२२.०१ | ४०८३३.३३ |

## “ प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना ”

**मार्गदर्शक सुचना : २०१६-१७**

### १.० प्रस्तावना -

महाराष्ट्र हे शेती प्रधान राज्य असून अजूनही ५५ टक्के लोकसंख्या पूर्णतः शेतीवर अवलंबून आहे. राज्यातील कोरडवाहू क्षेत्राचे प्रमाण ८० टक्के पेक्षा जास्त असून सिंचीत क्षेत्रामध्ये देखिल पाण्याच्या उपलब्धतेत शाश्वतता नाही. अमर्याद उपशामुळे भूजल पातळीत सातत्याने होत असलेली घट, नगदी पिकांखाली वाढत असलेले क्षेत्र, पारंपारीक सिंचन पध्दतीमुळे पाण्याचा होणारा अपव्यय, पर्जन्यमानातील दोलायमानता आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमिवर राज्यातील शेतीचे जलव्यवस्थापन ही बाब अत्यंत संवेदनशील झाली आहे. दुस-या सिंचन आयोगाच्या अहवालानुसार सर्व उपलब्ध स्त्रोताचा वापर केला तरी सिंचन क्षेत्राचे प्रमाण ३० टक्के पेक्षा जास्त होणार नसल्याने सिंचन कार्यक्षमतेचे महत्व अधोरेखीत होते. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा, आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे अत्यंत काटेकोरपणे, किफायतशीर आणि कार्यक्षमतेने वापर करुन जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होऊ न देता उत्पादकतेत वाढ करणे हे मोठे आव्हान आहे.

देशामध्ये महाराष्ट्र हे सूक्ष्म सिंचनाचा वापर करणारे अग्रेसर राज्य असून राज्यात सूक्ष्म सिंचनाचा वापर वाढविण्यासाठी “ राज्य पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना ” सन १९८६-८७ पासून सुरु करण्यात आली. केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना सन २००५-०६ पासून सुरु झाली. सन २०१०-११ पासून केंद्र शासनाने “ राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानाची ” सुरुवात केली. सन २०१४-१५ पासून राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान ऐवजी “ राष्ट्रीय शाश्वत शेती अभियांतर्गत ” “ शेतावरील पाणी व्यवस्थापन ”(OFWM) हे उपभियान राबविण्यात आले. या सर्व योजनांमधून राज्यामध्ये आतापर्यन्त ठिबक सिंचनाखाली १३.६६ लाख हेक्टर तर तुषार सिंचनाखाली ५.२१ लाख हेक्टर असे एकूण १८.८७ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले आहे.

सन २०१५-१६ पासुन सुक्ष्म सिंचन योजना “प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना”या केंद्र शासनाच्या महत्वकांक्षी योजनेमध्ये समाविष्ट केली आहे.प्रत्येक शेतक-यांच्या शेतास पाण्याची उपलब्धता करणे आणि पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळविणे (more crop per drop) हा या योजनेचा उद्देश आहे. सन २०१४-१५ पर्यंत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना ८०:२० (केंद्र-८० टक्के व राज्य २० टक्के) या प्रमाणात राबविण्यात येत होती. केंद्र शासनाने त्यांचे पत्र क्र. F.no.11 - 42/ 2015-Hort, Government of India,Ministry of Agriculture and Farmers Welfare, Department of Agriculture, Cooperation and Farmers Welfare(Horticulture Division),New Delhi dated 16 th November,2015 अन्वये केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजनेचे अंमलबजावणी करताना केंद्र व राज्य हिश्श्याच्या अर्थसहाय्याचे प्रमाण ६० : ४० विचारात घेण्यात यावे असे कळविले आहे. तसेच केंद्र शासनाने त्यांचे पत्र क्र. F.no.11 - 10/ 2016-Hort, Government of India,Ministry of Agriculture and Farmers Welfare, Department of Agriculture, Cooperation and Farmers Welfare,New Delhi dated 13 th April,2016 अन्वये सन २०१६-१७ मध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी, सन २०१५-१६ मध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत निर्गमित केलेल्या कार्यात्मक मार्गदर्शक सूचनामधील तरतूदीनुसार राबवावी असे कळविले आहे. तसेच प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेच्या कार्यात्मक मार्गदर्शक सूचनामधील परिच्छेद-६ नुसार तांत्रीक बाबी / खर्च प्रमाणके, देय अनुदानाचे प्रमाण ईत्यादी सध्याच्याच मार्गदर्शक सूचनानुसार राहतील आणि सन २०१५-१६ प्रमाणेच राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना(२०१४-१५) सन २०१६-१७ साठीही वापरण्याबाबत केंद्र शासनाने कळविले आहे.

केंद्र शासनाने त्यांचे पत्र क्र. F.no.11-10/ 2016-Hort, Government of India,Ministry of Agriculture and Farmers Welfare, Department of Agriculture, Cooperation and Farmers

Director, Horticulture, M.S

Welfare,New Delhi(Horticulture Division) dated 22 nd February,2016 अन्वये सन २०१६-१७ करीता राज्यासाठी रूपये २५०००.०० लाख रक्कम निर्धारीत केलेली आहे. त्यानुषंगाने केंद्र व राज्य हिस्सा प्रमाण विचारात घेवून **एकुण रु.४०८३३.३३ लक्ष (केंद्र हिस्सा रु.२५०००.०० लक्ष व राज्य हिस्सा रु.१५८३३.३३ लक्ष)** रकमेच्या वार्षीक कृती आराखडयास शासन निर्णय क्रमांक प्रकृसिं-२११६/प्र.क्र.१४०/४-अे,दि.१२ ऑगस्ट,२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. या अनुषंगाने " प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना" सन २०१६-१७ मध्ये राबविण्याकरीता पुढील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

## २.० प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना -

### २.१ योजनेची उद्दिष्ठ्ये -

१. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन सुक्ष्म सिंचनाखालील क्षेत्रात वाढ करणे.
२. जलवापर कार्यक्षमतेत वाढ करणे .
३. कृषी उत्पादन आणि पर्यायाने शेतक-यांच्या एकुण उत्पन्नात वृध्दी करणे .
४. समन्वयीत पध्दतीने विविध योजनांची अंमलबजावणी करणे .
५. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कृषि व फलोद्यानाचा विकास करण्यासाठी सुक्ष्म सिंचन पध्दती विकसीत करणे, त्याचा प्रसार करणे व वापर वाढविणे .
६. कुशल व अर्धकुशल बेरोजगारांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

सुक्ष्म सिंचनाखाली क्षेत्रात वाढ करणे, प्रात्यक्षिकाद्वारे आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करणे, प्रशिक्षण, प्रदर्शन, लोकसहभागातून जनजागृती करणे आणि वापरण्यात येणा-या संचातील घटकांचे गुणवत्ता नियंत्रण करणे हे या अभियानाचे प्रमूख घटक आहेत.

## २.२ योजनेची व्याप्ती -

"प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना" विदर्भातील ११ जिल्हयांसह राज्यातील ३४ जिल्हयांमध्ये राबविण्यात येणार आहे.

**पिके :** या योजनेंतर्गत सर्व पिकांचा समावेश करण्यात आला आहे. ऊस, कापुस यासारखी सर्व नगदी पिके, केळी, द्राक्षे, डाळींब यासारखी सर्व फळ पिके, याशिवाय सर्व कडधान्य, तृणधान्य, गळितधान्य पिके तसेच हळद, आले यासारखी सर्व मसाला पिके आणि सर्व भाजीपाला व फुलपिके या पिकांसाठी या योजनेंतर्गत शेतक-यांना सुक्ष्म सिंचन पध्दतीला अनुदान अनुज्ञेय आहे.

## २.३ अनुदान पात्र सुक्ष्म सिंचन पध्दती -

"प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना"या योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचन पदधतीसाठी अनुदान देय आहे. यामध्ये ठिबक सिंचन (इनलाईन, ऑनलाईन, सबसरफेस, मायक्रोजेट), तुषार संच (सुक्ष्म तुषार सिंचन,मिनी तुषार सिंचन, हलविता येणारे तुषार सिंचन, मिस्टर), रेनगन, सेमि परमनंट इरिगेशन सिस्टीम, यांचा समावेश आहे तसेच मायक्रोजेटस, फॅनजेटस,आणि तत्सम कमी डिसचार्ज असणा-या सिंचन पध्दतीसाठी सुध्दा अनुदान अनुज्ञेय आहे.

Director,Hotriculture,M.S

## २.४ निधी विनियोग -

**२.४.१** “प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना” या योजनेंतर्गत मंजूर अनुदानापैकी कमीत कमी ५० टक्के अनुदान अल्प व अत्यल्प भुधारक प्रवर्गातील शेतक-यांसाठी वापरण्यात यावे. त्यापैकी ३० टक्के लाभार्थी महिला असाव्यात (अल्प व अत्यल्प प्रवर्गातील महिला १५ टक्के व इतर प्रवर्गातील १५ टक्के). अनुसुचित जाती/अनुसुचित जमातीसाठी एकूण अनुदानाच्या अनुक्रमे १६ टक्के व ८ टक्के किंवा जिल्ह्यातील अनुसुचित जाती/अनुसुचित जमातीच्या लोकसंखेच्या प्रमाणात निधी खर्च करण्यात यावा.

**२.४.२** “ प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना ” या योजनेंतर्गत एकुण प्राप्त अनुदानापैकी २५ टक्के निधीचा वापर शेत पिकांसाठी (Crop sector) करण्यात यावा.

**२.४.३** कृषि आयुक्तालय स्तरावरुन प्रशासकीय मान्यतेच्या मंजूर कार्यक्रमांच्या मर्यादेत जिल्ह्यांना आर्थिक लक्षांक ठरवून देण्यात येईल. तसेच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुक्यांना आर्थिक लक्षांक ठरवून देण्यात यावा.

## २.५ अनुदान मर्यादा -

सन २०१६-१७ या वर्षासाठी सुक्ष्म सिंचनांतर्गत विविध क्षेत्र व घटकांसाठी शासनाने निर्धारीत केलेल्या किंमतीनुसार अनुदानाची मर्यादा खालीलप्रमाणे आहे. -

**१. अवर्षणप्रवण क्षेत्रातील -**

अल्प व अत्यल्प भुधारक - ६० % (३६% केंद्र हिस्सा **+** २४% राज्य हिस्सा)
सर्वसाधारण भुधारक - ४५ % (२७% केंद्र हिस्सा **+** १८% राज्य हिस्सा)

**२. अवर्षणप्रवण क्षेत्राबाहेरील -**

अल्प व अत्यल्प भुधारक - ४५% (२७% केंद्र हिस्सा **+** १८% राज्य हिस्सा)
सर्वसाधारण भुधारक - ३५% (२१% केंद्र हिस्सा **+** १४% राज्य हिस्सा)

(अत्यल्प भूधारक म्हणजे ज्यांचे क्षेत्र एक हेक्टर पर्यंत व अल्प भूधारक म्हणजे ज्यांचे क्षेत्र एक ते दोन हेक्टर पर्यंत आहे असे लाभार्थी.)

## ३.० प्रशासकीय मंजूरी -

**३.१** महाराष्ट्र शासन निर्णय क्र. प्रकृसिं-२११६/प्र.क्र.१४०/४अे, दि.१२/८/२०१६ अन्वये “प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना” राज्यात सन २०१६-१७ मध्ये राबविण्यासाठी, केंद्र हिस्यापोटी रु.२५०.०० कोटी आणि राज्य हिस्यापोटी रु.१५८.३३ कोटी अशा एकुण रु.४०८.३३ कोटी निधीच्या वार्षिक कृति आराखड्यास राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शर्थी व इतर बाबी ही योजना राबविताना बंधनकारक राहतील.

**३.२** प्रस्तूत योजनेसाठी जिल्हा नियोजन समितीकडून पूरक राज्य हिश्याचा निधी उपलब्ध करुन घ्यावयाचा आहे. राज्य हिस्स्यापोटी आवश्यक असणारी ४० टक्के अनुदानाची रक्कम जिल्हास्तरावरून जिल्हा नियोजन समितीने उपलब्ध करून द्यावयाची आहे.राज्य शासन निर्णय (नियोजन विभाग) जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का-१४४४, दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ नुसार जिल्हाधिकारी राज्य हिस्सा निधी वाटपासाठी नियंत्रक आहेत.सदर शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी योजनेची अंमलबजावणी करावी. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ३.१ नुसार जिल्हा वार्षिक योजनेतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना

Directorate of Agriculture, M.S

आहेत. जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-यांनी केंद्र हिस्साचा व त्यास पूरक राज्य हिस्स्याचा भौतिक व आर्थिक कार्यक्रम राबविण्यासाठी नियोजन करावे. या नियोजनानुसार **परिशिष्ट-१** अन्वये जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हाधिका-यांकडे राज्य हिस्स्यासाठी निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा. जिल्हाधिका-यांनी सदर प्रस्तावास **परिशिष्ट-२** नुसार प्रशासकीय मान्यता देऊन पूरक राज्य हिस्सा निधी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे उपलब्ध करून द्यावा.

**३.३** सन २०१६-१७ या वर्षात उपलब्ध होणारा निधी, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात व या योजनेतील पूर्व परवानगीने(Presanction)बसविण्यात आलेल्या संचासाठीच वापरण्यात यावा.

## ४.० प्रसिध्दी -

कृषि आयुक्तलायकडून योजनेच्या सन २०१६-१७ या वर्षासाठी मार्गदर्शक सुचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसाच्या कालावधीत सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांकडून अर्ज प्राप्त करून घेण्यासाठी जिल्हा स्तरावर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.त्यासाठी एस.एम.एस द्वारे, ग्राम पंचायतीच्या नोटीस बोर्डावर तसेच कृषि सहाय्यक ,कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी, उपविभागिय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, पंचायत समिती, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, तहशील या कार्यालयांमध्ये दर्शनी भागावर माहिती पत्रके लावावीत. या पत्रकांमध्ये अर्ज कोणत्या तारखेपासून कोणत्या तारखेपर्यंत (मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट - अ मधील अ.क्र.२ येथील नमूद कालावधीनुसार) स्विकारण्यात येतील, अर्ज ई-ठिबक प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने स्विकारणे, योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्ती,अर्जदाराने अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे यांचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

याशिवाय *जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी स्थानिक वर्तमान पत्रांमध्ये योजनेस व्यापक प्रसिध्दी देऊन शेतक-यांना ठिबक/तुषार संच बसविण्यासाठी विहीत प्रपत्रातील व विहीत मुदतीत अर्ज करण्यास अवाहान करावे.* रेडीओ जिंगल्स, वर्तमानपत्रातील जाहिराती, दूरदर्शनवरील जाहिराती, लोकराज्य मासिक,शेतकरी मासिक इत्यादी माध्यमांचा देखील योजनेच्या व्यापक प्रसिध्दीसाठी उपयोग करावा. यासाठीचा खर्च जिल्हास्तरावरील आकस्मिक निधीतून भागवावा. प्रसिध्दीमध्ये खालील मुद्यांचा अंतर्भाव प्रामुख्याने करावा. **(परिशिष्ट-३)**

१. शेतक-यांना सुक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी *विहीत मुदतीत* अर्ज (ई-ठिबक आज्ञावलीमध्ये व अभिलेखासह (Hard copy) तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयात) करण्याबाबतचे अवाहन
२. अवर्षणप्रवण क्षेत्रातील व अवर्षणप्रवण क्षेत्राबाहेरील,अल्प व अत्यल्प भुधारकासाठी आणि सर्वसाधारण भुधारकासाठी अनुदान मर्यादा.
३. सन २०१६-१७ साठी कृषि आयुक्तालयाकडील नोंदणीकृत सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांची यादी.
४. ठिबक सिंचन संचाच्या वेगवेगळ्या लॅटरल अंतर गटातील सर्व लॅटरल अंतरासाठी क्षेत्रनिहाय ठिबक सिंचन संचाचे आवश्यक साहित्य/घटक, अंदाजीत खर्च व अनुज्ञेय अनुदान
५. तुषार सिंचनाच्या कपलरच्या विविध आकारमानानुसार (६३ मिमी, ७५मिमी, ९०मिमी) क्षेत्रनिहाय आवश्यक साहित्य व खर्च मर्यादा .
६. विविध नोंदणीकृत उत्पादकांचे सुक्ष्म सिंचन संचाच्या विविध घटकांचे दरपत्रक.
७. सन २०१६-१७ साठी जिल्ह्यासाठी मान्यता दिलेल्या उत्पादकांची, वितरकांची व विक्रीपश्चात सेवा केंद्राची सुची.
८. सुक्ष्म सिंचन संच बसविल्यानंतरअनुदान मागणीकरीता सादर करावयाच्या कागदपत्रांची सुची.
९. अर्जदारांना त्यांच्या पसंतीच्या उत्पादकांकडून संच बसवून घेण्याची मुभा.
१०. निधी उपलब्धतेच्या मर्यादेत प्राधान्यक्रमाने पूर्वमान्यताप्राप्त झालेले लाभार्थीच अनुदानास पात्र असतील.

Director, Horticulture, M.S

## ५.० पात्र लाभार्थी -

### ५.१ खालील अटींची पुर्तता करणारे शेतकरीच सदर योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील

१. शेतक-याच्या नावे मालकी हक्काची जमिन असावी त्यासाठी त्यांनी स्वतःच्या मालकी हक्काचा ७/१२ व ८-अ उतारा प्रस्तावासोबत सादर करावा.

२. शेतक-याकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध असावी व त्याची नोंद ७/१२ उता-यावर असावी. ७/१२ उता-यांवर सिंचनाच्या सुविधेबाबतची नोंद नसल्यास विहीर किंवा शेततळयाबाबत शेतक-याकडून स्वयंघोषणापत्र घेण्यात यावे.

३. इतर साधनाद्वारे (बंधारे/कॅनॉल) सिंचनाची व्यवस्था असल्यास संबंधित(जलसंधारण/जलसंपदा) विभागाच्या अधिका-यांचे प्रमाणपत्र शेतक-याकडून घेण्यात यावे.

४. सामुहीक सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास इतर संबधीतांचे संमती पत्र सादर करावे.

५. विद्युत पंपाकरीता कायमस्वरुपी विद्युत जोडणी असावी.त्या पृष्ठ्यर्थ शेतक-याकडून मागील नजिकच्या काळाची विद्युत बिलाची प्रत प्रस्तावासोबत घेण्यात यावी.सोलर पंपाची व्यवस्था असल्यास सोलर पंप बसवून घेतल्याचे प्रमाणपत्र व सोलर पंपाबाबतची कागदपत्रे प्रस्तावा सोबत द्यावीत.

६. अनुदानाची रक्कम थेट शेतक-याच्या बँक खात्यात आरटीजीएस व्दारे जमा होणार असल्याने राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड बॅंकेत / सहकारी बँकेत खाते असल्याचा पुरावा. आधार नंबर असल्यास, सदर बँक खाते आधार कार्ड नंबरशी सलग्न असावे. तथापि अर्ज स्विकारतेवेळी बँक खाते आधार कार्डशी सलग्न नसले तरी अर्ज स्विकारण्यात यावा. मात्र प्रत्यक्ष अनुदानाची अदायगी करताना बँक खाते आधारकार्डशी सलग्न करण्याबाबत लाभार्थीस प्रवृत्त करावे.

७. पात्र शेतक-यांस ५ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत सुक्ष्म सिंचन योजनेचा लाभ देण्यात यावा. यापुर्वी शेतक-यांने कोणत्याही योजनेतून सुक्ष्म सिंचनाचा लाभ घेतला नसावा. तशा प्रकारचे ***लेखी निवेदन*** शेतक-याकडून घेण्यात यावे. त्याप्रमाणे तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील नोंदीवरून प्रत्यक्ष खात्री करून घेण्यात यावी. याबाबतची खातरजमा करण्याची संपुर्ण जबाबदारी कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक/ तालुका कृषि अधिकारी यांची राहील. याबाबतची खात्री उपविभागिय कृषि अधिकारी/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनीही करावी.

८. यापूर्वी ज्या लाभार्थ्यांनी मागील दहा वर्षात ५ हेक्टर किंवा जास्त क्षेत्रासाठी ठिबक व तुषार सिंचन योजनेचा लाभ घेतला आहे, असे लाभार्थी या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असणार नाहीत.

९. राष्ट्रीय बागवानी मंडळाकडून/इतर कोणत्याही केंद्र किंवा राज्य योजनेतंर्गत यापूर्वी सुक्ष्म सिंचन संचाकरीता अनुदान उपलब्ध करून घेतले असल्यास या योजनेतंर्गत त्याच सुक्ष्म सिंचन संचाकरीता लाभ घेता येणार नाही.

### ५.२ योजनेची अंमलबजावणी -

सन २०१२-१३ पासुन सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी संगणक प्रणालीचा (ऑनलाईन ई-ठिबक) अवलंब करण्यात येत आहे. सन २०१६-१७ मध्ये देखील या योजनेंतर्गत शेतक-यांना अर्ज करण्यासाठी "ई-ठिबक" या आज्ञावलीचा उपयोग बंधनकारक आहे. शेतक-यांनी अर्ज करण्यासाठी कृषि विभागाच्या www.mahaagri.gov.in या संकेतस्थळावरील " ई-ठिबक " या आज्ञावलीचा उपयोग करावा.

१. शेतक-यांकडून अर्ज फक्त ई-ठिबक आज्ञावलीमध्ये ऑनलाईन प्रणालीद्वारेच स्विकारण्यात यावेत.

२. ई-ठिबक आज्ञावलीमध्ये अर्जदाराकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर अर्जाची छाननी या मार्गदर्शक सुचना सोबतच्या **परिशिष्ट "अ"** मधील अ.क्र.३ येथील नमूद कालावधीत करुन त्यात काही त्रुटी आढळल्यास त्रुटीची पुर्तता करण्याबाबत तालुका कृषि अधिकारी यांनी अर्जदारास **परिशिष्ट "अ"** मधील अ.क्र.३ (अ) येथील नमूद कालावधीत नोंदणीकृत डाकेने पत्राद्वारे कळवावे.

३. एखाद्या अर्जदाराचा अर्ज नामंजूर झाल्यास त्याबाबतची कारणे संबंधित अर्जदारास लेखी कळवून त्याला सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील अ.क्र.४ येथील नमूद कालावधीत त्याचे म्हणणे मांडण्याची/त्रुटीची पूर्तता करण्यासाठी संधी देण्यात यावी.

Director,Horticulture,M.S

४.  पात्र लाभार्थी जाहिर करण्याकरीता, तालुका कृषि अधिकारी यांनी लाभार्थ्यांची यादी सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अ.क्र.४(अ) येथील नमूद कालावधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावी.

५.  जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अ.क्र.४(ब) येथील नमूद कालावधीत पात्र/अपात्र लाभार्थ्यांची यादी जाहिर करावी.

६.  जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना अनुदानाचे वाटप झाल्यानंतर, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अ.क्र.७ मधील नमूद कालावधीत तालुक्यांना आर्थिक लक्षांक निर्धारित करुन द्यावा.

**७.**  तालुका कृषि अधिकारी यांना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडून लक्षांक प्राप्त झाल्यानंतर या मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अ.क्र.८ मधील नमूद कालावधीत मंजूर लक्षांकाच्या मर्यादेत प्राथम्य क्रमानुसार (first come first serve) अर्जदारास पूर्व मान्यता ऑनलाईन प्रणालीमध्ये भरण्याबरोबरच नोंदणीकृत डाकेने पत्राद्वारे**(परिशिष्ट-५ मधील प्रपत्रात )**कळविण्यात यावी.***पूर्व मान्यता न घेता शेतक-याने सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी केली असेल व अनुदानासाठीचा प्रस्ताव सादर केला असेल तर अशा शेतक-यास अनुदान अनुज्ञेय असणार नाही.***

८. पुर्वसंमती पत्र प्राप्त झाल्यानंतर शेतक-याना त्यांच्या पसंतीच्या नोंदणीकृत कंपनीच्या वितरकाकडुन **अ.क्र.९** मधील नमूद कालावधीत संच बसवून घेणे बंधनकारक राहील. या मुदतीत शेतक-याने संच न बसविल्यास त्यांचे पुर्वसंमती पत्र रद्द समजण्यात येईल, तसेच सदर शेतक-याचा अर्ज ऑनलाईन प्रणालीतून बाद होईल.

९. अर्जदाराने पूर्व संमती घेवून सुक्ष्म सिंचन संच बसविल्यानंतर आवश्यक कागदपत्रासह (परिशिष्ट-४-अ) अनुदान मागणीचा प्रस्ताव **अ.क्र.९** मधील नमूद कालावधीत तालुका कृषि अधिका-यांकडे सादर करावा. त्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांनी प्रस्तावाची छाननी करुन बसविण्यात आलेल्या सूक्ष्म सिंचन संचाची मोका तपासणी (परिशिष्ट-९/१० मधील प्रपत्रात) या मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील ***अ.क्र.१०*** मधील नमूद कालावधीत संबंधित अधिका-यामार्फत करुन घ्यावी.प्राप्त झालेल्या मोका तपासणी अहवालाची ई-ठिबक आज्ञावलीमध्ये नोंद घ्यावी.

१०. मोका तपासणी झाल्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांनी अनुदानाची परिगणना व अनुदानाची शिफारस करण्यासाठी प्रस्ताव सोबतच्या परिशिष्ट “अ”मधील ***अ.क्र.११*** मधील नमूद कालावधीत उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

११. तालुका कृषि अधिका-यांकडून अनुदान परिगणनेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावाची उपविभागीय कृषि अधिकारी यांनी मार्गदर्शक सूचनांनूसार परिगणना करावी.त्यानंतर सोबतच्या परिशिष्ट “अ”मधील ***अ.क्र.१२*** मधील नमूद कालावधीत प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे शेतक-यांच्या खात्यात अनुदान जमा करण्याच्या शिफारसीसह सादर करावा.

१२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, अनुदानाची रक्कम या मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील **अ.क्र.१३** मधील नमूद कालावधीत ऑनलाईन पध्दतीने (RTGS द्वारे) लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी. तसेच लाभार्थ्याने बिगर बँकिंग वित्तिय संस्था किंवा अनुसुचित जाती/जमाती महामंडळे, सहकारी बँका,राष्ट्रीयकृत बँका किंवा बहुराष्ट्रीय खाजगी बँका यामधून कर्ज घेऊन सुक्ष्म सिंचन संच बसविल्यास व त्याला देय अनुदानाची रक्कम त्याने घेतलेल्या कर्जापोटी त्यांच्या कर्ज खात्यावर जमा करण्यास लेखी अनुमती दिल्यास सदर लाभार्थीच्या अनुदानाची रक्कम कर्ज खात्यावर जमा करण्यात यावी.

१३. पूर्व मान्यता न घेता शेतक-याने सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी केली असल्यास व अनुदानासाठीचा प्रस्ताव सादर केला असेल तर अशा शेतक-यास अनुदान अनज्ञेय असणार नाही.

१४. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी लाभार्थ्यांची निवड आणि अनुदानाचे वितरण पारदर्शक पध्दतीने व त्वरेने होईल याची खातरजमा करावी.

१५. राज्यातील सर्व जिल्ह्यात सर्व सुक्ष्म सिंचन योजनांसाठी वरीलप्रमाणे एकसमान पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

Director,Horticulture,M.S

१६. लाभार्थ्यांची निवड ही प्राथम्यक्रमानुसार करण्यात येते त्यामुळे प्रत्येक टप्प्यावर नेमून दिलेल्या कालावधीपर्यंत कार्यवाहीसाठी वाट पाहण्याची आवश्यकता नाही. उदा.शेतक-यांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर अर्जाची छाननी करण्यासाठी ३० दिवसाच्या कालावधीपर्यंत वाट पहाण्याची आवश्यकता नाही. अर्ज प्राप्त झाल्यानंतर तातडीने अर्जाची छाननी करण्यासाठी ३० दिवसाच्या कालावधीपर्यंत वाढ पहाण्याची आवश्यकतस नाही. अर्ज प्राप्त झाल्यानंतर तातडीने अर्जाची छाननी करणे, त्रुटी असल्यास अर्जदारास कळविणे, पूर्वमान्यता देणे याबाबतची कार्यवाही करण्यास सुरवात करण्यात यावी. एकदा ३० दिवसाचा कालावधी पूर्ण झाला की, अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही बंद करण्यात यावी. याच प्रकारची कार्यवाही प्रत्येक टप्प्यावर करण्यात यावी.

१७. तालुका/जिल्हयास ठरवून दिलेल्या आर्थीक/भौतीक उद्दीष्टांएवढे अर्ज लाभार्थीकडून विहीत कालावधीत ऑनलाईन भरून घेण्यासाठी तालुका कृषि अधिकारी/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी व्यापक प्रयत्न करावेत व त्यातूनही ज्या जिल्हयांमध्ये पुरेसे अर्ज प्राप्त झालेले नसतील तर त्या जिल्हयांमधील ऑनलाईन प्रणाली आवश्यकतेनुसार पुन्हा सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव संचालक(फलोत्पादन) यांना सादर करावा.

## ५.२.१ ऑनलाइन प्रणालीवर अर्ज करणे व अर्जावर करावयाची कार्यवाही -

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.प्रकृसिं-२११६/प्र.क्र.१४०/४-अे,दि.१२/८/२०१६ अन्वये " प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना " साठी सन २०१६-१७ मध्ये शेतक-यांकडून अर्ज फक्त ई-ठिबक आज्ञावलीमध्ये ऑनलाईन प्रणालीद्वारेच स्विकारण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.प्रकृसिं-२११६/प्र.क्र.१४०/४-अे,दि.१२/८/२०१६ अन्वये शेतक-यांना अर्ज करण्यासाठी ठराविक कालमर्यादा (या मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील अ.क्र.२ येथील नमूद केल्याप्रमाणे ३० दिवसाची) ठेवण्यात आलेली आहे. या कालमर्यादेतच शेतक-यांचे अर्ज "ई-ठिबक" ऑनलाइन प्रणालीवर तसेच अभिलेखासह (Hard copy) तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयात स्विकारण्यात येतील.

२. सन २०१६-१७ मध्ये शेतक-यांनी अर्ज करण्यासाठी कृषि विभागाच्या www.mahaagri.gov.in या संकेतस्थळावरील " ई-ठिबक" या आज्ञावलीचा उपयोग करावा.

३. शेतक-यास जर उपरोक्त अ.क्र.२ प्रमाणे शक्य नसेल तर त्यांनी तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन " ई-ठिबक" ऑनलाइन प्रणालीवर अर्ज करावेत. तालुका कृषि अधिकारी यांनी याकामी शेतक-यांना मदत करणे बंधनकारक आहे.

४. उपरोक्त अ.क्र.२ किंवा ३ प्रमाणे "ई-ठिबक" या आज्ञावलीमध्ये अर्ज केल्यानंतर शेतक-यांने **परिशिष्ट -४** मधील नमुन्यातील अर्ज (Hard copy) सर्व माहिती व अभिलेखासह तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावेत. *शेतक-यांने परिशिष्ट -४ मधील नमुन्यातील अर्ज (Hard copy) सर्व माहिती व अभिलेखासह "ई-ठिबक" या आज्ञावलीमध्ये अर्ज केल्यापासून ३० दिवसाच्या आत तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे.* या मुदतीत शेतक-यांने जर अर्ज (Hard copy) तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केला नाही तर त्यांचा "ई-ठिबक" या आज्ञावलीमधील अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

५. तालुका कृषि अधिकारी यांनी " ई-ठिबक" ऑनलाइन प्रणालीवर प्राप्त अर्ज आणि **परिशिष्ट -४** मधील सर्व माहितीसह व अभिलेखासह त्यांच्या कार्यालयास प्राप्त अर्ज (Hard copy)या दोन्हीची छाननी करावी. ही छाननी शेतक-यांचे अर्ज(Hard copy) तालुका कृषि अधिकारी कार्यालयास प्राप्त झाल्यापासून दहा दिवसाच्या आत करावी (मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील अ.क्र.३ मधील नमूद कालावधीत). सदर छाननी शेतक-यांची योजनेतील पात्रता/अपात्रता निश्‍चित करण्यासाठी करावयाची आहे. त्यामुळे ती मार्गदर्शक सुचनेनुसार करणे

Director,Horticulture,M.S

आवश्यक आहे. छाननी करताना शेतक-यांच्या मालकी हक्काचा ७/१२ व ८-अ उतारा, सिंचनाची सुविधा, कायमस्वरुपी विद्युत जोडणी,आर.टी.जी.एस प्रणालीची सुविधा असलेल्या राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड /सहकारी बँकेतील खाते, एन.बी.एफ.सी/*अनुसुचित जाती/जमाती महामंडळे, सहकारी बँका,राष्ट्रीयकृत बँका किंवा बहुराष्ट्रीय खाजगी बँका*कडून कर्ज पुरवठा होणारे शेतकरी, ५ हेक्टर क्षेत्र मर्यादेतील लाभ, यापूर्वी लाभार्थ्यांनी मागील दहा वर्षात ५ हेक्टर किंवा जास्त क्षेत्रासाठी ठिबक व तुषार सिंचन योजनेचा लाभ घेतलेला नाही, राष्ट्रीय बागवानी मंडळाकडून/इतर कोणत्याही केंद्र किंवा राज्य योजनेतंर्गत यापूर्वी त्याच सुक्ष्म सिंचन संचाकरीता लाभ घेतला नाही इत्यादी व इतर सर्व अनुषंगिक बाबीचा विचार करण्यात यावा.

६. उपरोक्त अ.क्र.४ मधील छाननीमध्ये, शेतक-यांनी तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केलेला अर्ज (परिशिष्ट -४ मधील नमुन्यातील सर्व माहिती व अभिलेख) तसेच “ई-ठिबक” या ऑनलाइन प्रणालीवर नोंदविलेली माहिती यामध्ये त्रुटी आढळून आल्या तर त्या पाच दिवसाच्या आत (मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अ.क्र.३ ब मधील नमूद कालावधीत)संबंधित शेतक-यांना नोंदणीकृत डाकेने पत्राद्वारे कळविणे बंधनकारक आहे.शेतक-यांना पाठवयाचे सदरचे पत्र “ई-ठिबक” या ऑनलाइन प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. या त्रुटीची पुर्तता दहा दिवसाच्या आत (मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अ.क्र.४ मधील नमूद कालावधीत) करण्याचे निर्देश संबंधित शेतक-यांना याच पत्राद्वारे द्यावेत. संबंधित शेतक-यांनी त्रुटीची पुर्तता दहा दिवसाच्या आत केली नाही तर त्यांचे अर्ज अपात्र ठरविण्यात यावेत.

७. उपरोक्त अ.क्र.५ व ६ नुसार तालुका कृषि अधिकारी यांनी केलेल्या छाननीअंती पात्र ठरविलेल्या शेतक-यांची यादी प्रसिद्ध करण्यासाठी “ ई-ठिबक ” या ऑनलाइन प्रणालीवरुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या लॉगईन मध्ये त्याचवेळी उपलब्ध होईल.

८. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून “ ई-ठिबक ” या ऑनलाइन प्रणालीवरुन वेळोवेळी प्राप्त झालेली पात्र शेतक-यांची यादी “ ई-ठिबक ” या ऑनलाइन प्रणालीवर तीन दिवसाच्या आत(मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अ.क्र.४-ब मधील नमूद कालावधीत) प्रसिद्ध करावी. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रसिद्ध केलेली पात्र शेतक-यांची यादी तालुका कृषि अधिकारी यांच्या लॉगईन मध्ये पुर्वसंमती साठी त्याचवेळी उपलब्ध होईल.

९. तालुका कृषि अधिकारी यांनी चार दिवसाच्या आत (मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट “अ”मधील अ.क्र.८ मधील नमूद कालावधीत) पात्र शेतक-यांना ***उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत*** प्राथम्य क्रमानुसार (first come first serve) “ई-ठिबक” या ऑनलाइन प्रणालीवरून पुर्वमान्यता द्यावी. तसेच संबंधित शेतक-यांना नोंदणीकृत डाकेने पत्राद्वारे देखील पुर्वमान्यता कळविण्यात यावी.

१०. पुर्वमान्यता देण्यात आलेल्या शेतक-याना त्यांच्या पसंतीच्या नोंदणीकृत कंपनीच्या वितरकाकडुन एक महिन्याच्या आत संच बसवून घेणे बंधनकारक राहील. या मुदतीत शेतक-याने संच न बसविल्यास त्यांचे पुर्वसंमती पत्र रद्द समजण्यात येईल, तसेच सदर शेतक-याचा अर्ज ऑनलाईन प्रणालीतून बाद होईल. त्यानंतर गरजेनुसार त्याला विहीत पध्दतीने पुन्हा अर्ज करता येईल .

११. पुर्वमान्यतेनंतर संबधीत शेतक-याने ३० दिवसाच्या आत संच बसवून घेणे व अनुदान मागणीचा प्रस्ताव (परिशिष्ट ४-अ मध्ये नमुद केलेल्या सर्व कागदपत्रासह ) तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

Director,Hotriculture,M.S

१२. अनुदान मागणीचा प्रस्ताव (परिशिष्ट ४-अ) प्राप्त झाल्यावर तालुका कृषि अधिकारी कार्यालयात त्याच दिवशी आवक रजिस्टर मध्ये नोंद करुन त्याची पोहोच पावती नमूना परिशिष्ट-८ मधील नमुन्यात संबंधित शेतक-यास देण्यात यावी.

***१३. अनुदान मागणीचे प्राप्त झालेले प्रस्ताव/अर्ज तालुका कृषि अधिकारी कार्यालयात तारखेनुसार*** व प्रवर्ग निहाय (अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती/अल्प, अत्यल्प व महिला शेतकरी ) नोंदवावेत.

१४. अनुदान मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांनी प्रस्तावांची छाननी करून बसविण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संचाची मोका तपासणी पंधरा दिवसाच्या आत (मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील अ.क्र.१० मधील नमूद कालावधीत) संबंधित कर्मचारी/ अधिका-यामार्फत करुन मोका तपासणी अहवालाची ई-ठिबक आज्ञावलीमध्ये नोंद करणे आवश्यक आहे.

१५. मोका तपासणी झाल्यानंतर अनुदानाची परिगणना व अनुदानाची शिफारस करण्यासाठी प्रस्ताव ई-ठिबक आज्ञावलीद्वारे तालुका कृषि अधिकारी यांनी तीन दिवसाच्या आत (सोबतच्या परिशिष्ट "अ"मधील अ.क्र.११ मधील नमूद कालावधीत) उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

१६. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी प्राप्त झालेल्या प्रस्तावाची मार्गदर्शक सूचनांनुसार अनुदान परिगणना करून दोन दिवसाच्या आत (सोबतच्या परिशिष्ट "अ"मधील अ.क्र.१२ मधील नमूद कालावधीत) प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे शेतक-यांच्या खात्यात अनुदान जमा करण्याच्या शिफारसीसह सादर करावा.

१७. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, अनुदानाची रक्कम पाच दिवसाच्या आत (मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट "अ"मधील अ.क्र.१३ मधील नमूद कालावधीत) ऑनलाईन पध्दतीने (RTGS द्वारे) लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी.

### ५.३ सुक्ष्म सिंचन संच बसविणे बाबत कार्यवाही -

१. सुक्ष्म सिंचन संच बसविण्यापुर्वी शेतक-याने, त्याच्या पसंतीनुसार निवडलेल्या उत्पादक कंपनीने किंवा त्यांचे प्रतिनिधीने शेतक-या बरोबर परिशिष्ठ- ६ प्रमाणे करार करणे आवश्यक आहे.

२. कंपनीच्या तज्ञ प्रतिनिधीने अर्जदार शेतक-याच्या शेताचे सर्वेक्षण करुन पिकाच्या दोन ओळीमधील अंतर, दोन रोपामधील अंतर, पिकनिहाय पाण्याची गरज, माती व पाणी परिक्षण अहवाल इत्यादिच्या आधारे सुक्ष्म सिंचन संचाचा आराखडा तयार करावा.

३. सुक्ष्म सिंचन संचाचा आराखडा ग्राफ पेपरवर असावा. आराखडा ''तांत्रिकदृष्ट्या योग्य व आर्थिकदृष्ट्या किफायतशिर''असल्याचे प्रमाणपत्र कंपनीच्या तज्ञ प्रतिनिधीने द्यावे. कंपनीने / कंपनी प्रतिनिधीने सदरचा आराखडा तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा व त्याची प्रत संबंधित शेतक-यास द्यावी.

४. तालुका कृषि अधिकारी यांनी सदरचा आराखडा केंद्र शासनाने विहीत केलेल्या मापदंडानुसार योग्य असल्याबाबत खात्री करावी.

५. शेतक-यावर भुर्दंड पडणार नाही अशी स्थळ व पिकनिहाय विनिर्दिष्ट तांत्रीक सिंचन यंत्रणा अवलंबविण्यात यावी (Cost Effective Micro Irrigation System).म्हणजेच भौगोलिक संरचना व पिकांचा प्रकार विचारात घेऊन सुक्ष्म सिंचन संच बसवावा.

६. संबंधित कंपनी प्रतिनिधी व त्यांचे वितरकाने तांत्रिकदृष्ट्या योग्य आराखड्याप्रमाणे संच बसविण्याची कार्यवाही पुर्ण करावी. संचातील घटक हे केंद्र शासनाने विहीत केलेल्या बी.आय.एस.(BIS) दर्जाचे असणे बंधनकारक आहे.

### ५.४ अनुदान प्रस्ताव

सुक्ष्म सिंचन संच कार्यान्वयीत झाल्यावर संबधीत शेतक-याने अनुदान मागणीचा प्रस्ताव परिशिष्ट-४अ मध्ये दोन प्रतीत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करावा. प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्याची नोंद तालुका कृषि अधिकारी कार्यालयात कालानुक्रमानुसार नोंदवही परिशिष्ट-७ मध्ये घ्यावी व असे प्रस्ताव कालानुक्रमानुसार

Director,Horticulture,M.S

हाताळले जातील, याची दक्षता तालुका कृषि अधिकारी यांनी घ्यावी. सुक्ष्म सिंचन संचाच्या अनुदान मागणीचे प्रस्ताव शेतक-यांनी खालील कागदपत्रासह सादर करावेत.

१. पूर्वसंमती पत्र (परिशिष्ट-५)

२. उत्पादक कंपनीने/कंपनी प्रतिनिधीने ग्राफ पेपरवर स्केलसह तयार केलेला सुक्ष्म सिंचन संचाचा आराखडा.

३. सुक्ष्म सिंचन संच बसवावयाच्या क्षेत्रातील माती व पाणी परिक्षणाचा तपासणी अहवाल(परिच्छेद क्र.५.९ प्रमाणे)

४. संच कार्यान्वीत असल्याबाबतचे शेतक-याचे पत्र.

५. रोखीने संच बसविला असेल तर लाभार्थीचे राष्ट्रीयकृत बॅकेत किंवा ज्या बॅकेत आर.टी.जी.एस. प्रणालीची सुविधा आहे, त्या बँकेचे नाव व बँक खाते क्रमांक दर्शविणा-या पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.

६. लाभार्थ्याने बिगर बँकिंग वित्तिय संस्था किंवा अनुसुचित जाती/जमाती महामंडळे, सहकारी बँका,राष्ट्रीयकृत बँका किंवा बहुराष्ट्रीय खाजगी बँका यांचेकडून कर्ज घेऊन सुक्ष्म सिंचन बसविल्यास संबंधित बिगर बँकिंग वित्तिय संस्था किंवा अनुसुचित जाती/जमाती महामंडळे, सहकारी बँका,राष्ट्रीयकृत बँका किंवा बहुराष्ट्रीय खाजगी बँका यांच्या बँक खात्यात अनुदान जमा करबाबतचे लेखी निवेदन/पत्र

७. सुक्ष्म सिंचन संच साहित्याचे सर्व करासहित, कंपनीच्या अधिकृत वितरकाने स्वाक्षरीत केलेले बील. (व्हॅट क्रमांकासह)

८. कंपनीच्या वतीने बिलावर स्वाक्षरी करणा-या प्राधिकृत प्रतिनिधीची / वितरकाची नमुना स्वाक्षरी (Specimen Signature)

९. शेतक-यांनी निवड केलेल्या उत्पादक कंपनीशी /कंपनी प्राधिकृत प्रतिनिधीशी परिशिष्ट-६ प्रमाणे केलेला करारनामा.

१०. शेतक-यांना सुक्ष्म सिंचन संचबाबतचे साहित्य, सर्व्हिस कुपन्स व पोस्टकार्डस् मिळाल्याबाबत शेतक-याची पोहोच.

११. सामुदायिक सिंचन सुविधा असल्यास पाणी उपलब्ध होण्याबाबतचे संमतीपत्र.

१२. पुढील किमान ५ वर्ष सुक्ष्म सिंचन संच विकणार नाही, भाडयाने देणार नाही किंवा बक्षीस/भेट देणार नाहीत असे संबंधीत शेतक-याचे करारपत्र

१३. अर्जासोबत शेतक-याचे निवडणूक ओळखपत्र/आधारकार्ड/पॅनकार्ड/बॅंकचे पासबुकाची पहिल्या पानाची छायांकीत प्रत जोडावी तसेच, लाभार्थी शेतक-याचे छायाचित्र (Photograph) अर्जाच्या वरील बाजूस लावण्यात यावे.

१४. तालुका कृषि अधिकारी यांनी शेतक-याचा अनुदान मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्याबाबतची नोंद परिशिष्ट-७ नुसार त्यांच्या कार्यालयातील नोंदवहीत घ्यावी.

१५. तालुका कृषि अधिकारी यांनी अनुदान मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्याबाबत शेतक-यास लेखी स्वरुपात पोहोच पावती परिशिष्ट-८ प्रमाणे द्यावी.

***१६. आर.टी.जी.एस. व्दारे अनुदान वितरीत होणार असल्याने अचुक पध्दतीने संबंधीत शेतक-याच्या खात्यात अनुदान वितरण होण्यासाठी बँकेचा खाते क्रमांक तपासण्याची पुर्णतः जबाबदारी तालुका कृषि अधिका-याची राहील.***

१७. लाभार्थीचे अनुदान जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावरुन बॅक खात्यात आर.टी.जी.एस.द्वारे वर्ग करण्यात येणार असल्याने लाभार्थीचे बॅक खाते, राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड/सहकारी बॅकेत किंवा ज्या बॅकेत आर.टी.जी.एस प्रणालीची सुविधा आहे तेथेच असणे बंधनकारक करण्यात आले आहे .

१८. मार्गदर्शक सुचनांमधील तरतुदी व मानकांनुसार शेतक-याने उपकरणे बसविलेली आहेत यांची खातरजमा केल्यानंतरच अनुदानाची रक्कम अदा करण्यात यावी.

## ५.५ अनुदान प्रस्तावावरील कार्यवाही

*१. अनुदान मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांनी ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीत बिल इनव्हाईसची नोंद करावयाची आहे. ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीवर बिल इनव्हाईसची घटकनिहाय नोंद करण्याची गरज नाही. वितरकाकडुन प्राप्त बिलाची फक्त एकुण रक्कम ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीत भरावी*



Director,Horticulture,M.S

२.	अनुदान मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांनी, शासन निर्णय दिनांक १२ ऑगस्ट २०१६ मधील तरतूदीनुसार, संबधीत कृषि सहाय्यकाकडून संचाची १०० टक्के तपासणी करुन घ्यावी. कृषि सहाय्यकाने तपासणी केलेल्या संचापैकी कृषि पर्यवेक्षकाने किमान ५० टक्के संच, मंडळ कृषि अधिकारी यांनी किमान ३० टक्के संच आणि तालुका कृषि अधिकारी यांनी २० टक्के संचांची मोका तपासणी करावी. या मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील अ.क्र.९ मधील नमूद कालावधीत म्हणजेच अर्जदाराकडून अनुदानासाठीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधिका-यामार्फत करुन मोका तपासणी अहवालाची ई-ठिबक आज्ञावलीमध्ये नोंद घेणे आवश्यक आहे.मोका तपासणी करण्यासाठी उपरोक्त तीनही संवर्गाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या कामाच्या व्याप्तीचा आढावा घेवून मोका तपासणीचे नियोजन व सनियंत्रण तालुका कृषि अधिकारी यांनी करावयाचे आहे. मोका तपासाणी अहवालावर लाभार्थिची / त्याच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी घेऊन त्याखाली त्यांचे नाव नमूद करावे. तसेच अहवालासोबत प्रक्षेत्रावर जोडणी केलेल्या सुक्ष्म सिंचन संचाचे शेतकरी किंवा त्याचे प्रतिनिधीसह छायाचित्र जोडावे. छायाचित्राचा खर्च कंपनी / वितरक यांनी करावा. याबाबतचा सविस्तर सुचना परिच्छेद क्र.५.११ मध्ये दिलेल्या असून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. कृषि पर्यवेक्षक/मंडल कृषि अधिकारी / तालुका कृषि अधिकारी यांनी केलेल्या मोका तपासणीचे अहवाल तालुका कृषि अधिकारी कार्यालयात सादर करावेत. हे अहवाल प्राप्त झाल्यानंतरच तालुका कृषि अधिकारी यांच्या login मधून,कृषि पर्यवेक्षक/मंडल कृषि अधिकारी/तालुका कृषि अधिकारी यांनी केलेली मोका तपासणी ऑनलाईन प्रणालीत नोंदवावी. ***कोणत्याही परिस्थितीत कृषि सहाय्यकाने केलेली तपासणी, मोका तपासणी म्हणून ऑनलाईन प्रणालीत करण्यात येवू नये.***

४.	मोका तपासणीच्या आधारे केंद्र शासनाने निर्धारीत केलेल्या संच उभारणीच्या किंमतीच्या मर्यादेत व परिच्छेद क्र. २.५ मधील टक्केवारीनुसार अनुदानची निश्चिती तालुकास्तरावरून करून प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावेत.

५.	उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयात अर्जाची तसेच अनुदान परीगणनेची तपासणी करावी. पात्र प्रस्तावांची अनुदानसाठी शिफारस करून प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवरून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करावेत.

६.	जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी, कृषि आयुक्तलयाने जिल्ह्यासाठी निश्चित केलेल्या लक्षांकाच्या व अनुदानाच्या मर्यादेच्या अधिन राहून उपविभागाकडून अनुदानासाठी शिफारस केलेल्या प्रस्तावांना मंजूरी द्यावी. मंजूर प्रस्तावासाठी आवश्यक केंद्र व राज्य हिस्सा कोषागारतून आहरीत करून जिल्हास्तरावर बॅक खात्यात जमा करावा.

७.	लाभार्थीचे अनुदान जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावरुन लाभार्थीच्या बॅक खात्यात आर.टी.जी.एस. द्वारे जमा करावे किंवा लाभार्थ्याने बिगर बँकिंग वित्तिय संस्था किंवा अनुसुचित जाती/जमाती महामंडळे यांचेकडून कर्ज घेऊन सुक्ष्म सिंचन संच बसविल्यास व तसे लेखी दिल्यास संबंधित बिगर बँकिंग वित्तिय संस्था किंवा अनुसुचित जाती/जमाती महामंडळे, सहकारी बँका,राष्ट्रीयकृत बँका किंवा बहुराष्ट्रीय खाजगी बँका यांच्या बँक खात्यात जमा करावे.

Director Horticulture M.S

### ५.६ सुक्ष्म सिंचन संच प्रस्तावासाठी कर्ज उभारणी

#### ५.६.१ वित्तिय संस्थांमार्फत कर्ज उभारणी

१.	सन २०१६-१७ मध्ये राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड बँका किंवा बिगर बँकिंग वित्तिय संस्था (Non-banking financial company) किंवा अनुसुचित जाती/जमाती महामंडळे, सहकारी बँका,राष्ट्रीयकृत बँका किंवा बहुराष्ट्रीय खाजगी बँका मार्फत कर्ज घेवून शेतक-यास संचाची उभारणी करावयाची असल्यास खालील प्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

२.	तालुका कृषि अधिकारी यांचेकडून सुक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी पुर्वसंमती पत्र प्राप्त झाल्यानंतर शेतकरी त्यांच्या पसंती प्रमाणे उत्पादक कंपनीच्या वितरकाकडून शेत परिस्थितीनुसार सुक्ष्म सिंचन संचासाठी येणा-या खर्चाचा प्रस्ताव, बँकेकडे कर्ज मंजूरीसाठी सादर करावेत.

३. सुक्ष्म सिंचन संचासाठी कर्जाचा प्रस्ताव शेतक-याकडून प्राप्त झाल्यानंतर संबधीत बँकेने प्रस्तावाची छाननी करुन शेतक-यास कर्ज मंजूरीबाबत हमीपत्र द्यावेत.
४. कर्ज मंजूरीबाबत हमीपत्र प्राप्त झाल्यानंतर शेतक-याने, उत्पादक कंपनीकडून व वितरकाकडून प्रत्यक्ष शेतावर सुक्ष्म सिंचन संच एक महिन्याच्या आत बसवून घ्यावेत.
५. लाभार्थी शेतक-याने संच बसविल्यानंतर अनुदान मागणीचा प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावेत. तालुका कृषि अधिकारी यांनी मंडळ कृषि अधिकारी व व कर्ज पुरवठा करणा-या संस्थांच्या प्रतिनिधी मार्फत संचाची संयुक्त मोका तपासणी करुन घ्यावी.
६. संयुक्त मोका तपासणीची नोंद ऑनलाईन प्रणालीत करून तालुका कृषि अधिकारी अनुदान अदायगीबाबत प्रस्ताव मंजूरीस्तव उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावेत. तसेच तालुका कृषि अधिकारी यांनी उत्पादक कंपनीस अदा करावयाच्या कर्ज रक्कमेबाबत बँकेस प्रमाणपत्र द्यावे.
७. तालुका कृषि अधिकारी यांचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर बँकेने कर्ज रकमेचा धनादेश शेतक-यामार्फत संबंधित सुक्ष्म सिंचन कंपनीस / पुरवठादार/ विक्रेता यांना अदा करावा.
८. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मंजूरीप्रमाणे अनुदानाची रक्कम कर्ज पुरवठा करणा-या बँकेतील शेतक-यांच्या कर्ज खात्यावर/बिगर बँकिंग वित्तिय संस्था किंवा अनुसुचित जाती/जमाती महामंडळे, सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बँका किंवा बहुराष्ट्रीय खाजगी बँका यांच्या बँक खात्यात जमा करावी.

### ५.६.२ विविध महामंडळामार्फत कर्ज उभारणी -

राष्ट्रीय अनुसुचित जाती व जमाती वित्तिय व विकास महामंडळामार्फत वित्तपुरवठा होणा-या राज्यातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व संत रोहिदास लेदर इंडस्ट्रीज ॲण्ड चर्मकार विकास महामंडळ इ.मार्फत अनुसुचित जाती व जमातीच्या शेतक-यांना अल्प व्याजदराने कर्जपुरवठा करण्यात येतो. या महामंडळाकडून अनुसुचित जाती व जमातीच्या शेतक-यांना सुक्ष्म सिंचन योजनेसाठी कर्ज पुरवठा करणेबाबतचा निर्णय कृषि आयुक्तलयात झालेल्या बैठकित झाला आहे. त्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सुचना कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.फलो-४/सु.सिं./अनु.जा.व जमाती/१२०४,दि.२७/१०/२०१५ रोजी निर्गमित करण्यात आल्या आहेत.त्याप्रमाणे कार्यवाही करुन अनुसुचित जाती व जमातीसाठी उपलब्ध करून दिलेल्या निधीचा संपुर्ण विनियोग करावा. अनुसुचित जाती व जमाती लाभार्थीसाठी दिलेला निधी अखर्चित राहणार नाही अथवा समर्पित होणार नाही याची सर्वच स्तरावर दक्षता घ्यावी.

### ५.७ अनुदान प्रस्तावाबाबत काही महत्वाच्या बाबी -

१. शेतक-याकडे आवश्यक सिंचनस्त्रोत उपलब्ध असणे आवश्यक आहे. उपलब्ध पाण्याचा विचार करुन तेवढ्याच क्षेत्राकरीता लाभ घेता येईल.
२. विद्युत पुरवठा, चारी खोदणे, पंप, पॅनेल, विद्युतीकरणाचे काम इ. बाबीकरीता येणारा खर्च लाभार्थ्यांनी स्वतः करावयाचा आहे.
३. विहिर, बोअर, ओव्हरहेड टँक, इंजिन / विद्युत पंप संच व त्यांचा कोणताही भाग, जनरेटर सेट इत्यादी अनुषंगीक बाबीसाठी अनुदान अनुज्ञेय असणार नाही.
४. नव्याने सिंचन स्त्रोत निर्माण करण्यासाठी अनुदान देय नाही.
५. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये फिटींग्ज व ॲक्सेसरीज सेटचा उल्लेख असून त्याच्या खर्चाचा एकूण खर्चामध्ये समावेश केलेला आहे. फिटींग्जमध्ये टी, एल्बो, रिड्यूसर, फिमेल थ्रेडेड अडाप्टर, मेल थ्रेडेड अडाप्टर, एन्ड कॅप, नट बोल्टसह फ्लँज, सर्व्हिस सॅडल, बेन्ड, जीआयएन निपल, टालफॅन टॅब, पीव्हीसी सेन्ट्रल जॉईट इ. बाबींचा समावेश होतो. ॲक्सेसरीजमध्ये स्टार्ट कनेक्टर, रबर ग्रोमेट, निपल, रिड्यूसर, टी, एल्बो, डमी ड्रीपर, एन्ड कॅप इ. बाबींचा समावेश आहे. संच उभारणीसाठी प्रत्यक्ष शेतावर उपरोक्त साहित्याच्या वापरानुसारच बिल देणे बंधनकारक आहे. कोणत्याही परिस्थितीत मोघम स्वरुपाचे बिल देण्यात येउ नये.

Director Horticulture, M.S

६. मुख्य पीक व आंतरपिकांत संच बसविला असल्यास शेतक-याच्या पसंतीनुसार एकाच पिकास, लॅटरल अंतर गटाच्या निर्धारित खर्च मर्यादाप्रमाणे देय असलेले अनुदान देण्यात येईल.

७. ***शेतक-यांच्या ७/१२ उता-यावर विहिरीची नोंद नसल्यास लेखा परिक्षणात आक्षेप घेण्यात येतात.*** यास्तव प्रस्तावा बरोबर जोडलेल्या ७/१२ उता-यावर विहिरीची नोंद असणे आवश्यक आहे. मात्र प्रत्यक्षात विहिर असूनही केवळ ७/१२ उता-यावर नोंद घेतलेली नाही म्हणून शेतक-यांची अडवणूक होऊ नये म्हणून सिंचनाची सुविधा (विहिर/शेततळे) उपलब्ध असल्याचे शेतक-यांचे स्वयं घोषणापत्र घ्यावे हे घोषणापत्र ७/१२ उता-यासोबत लावावे.

८. पिकांच्या लागवडीचा हंगाम विचारात घेता काही वेळा पिकाची नोंद ७/१२ उता-यावर महसूल विभागामार्फत उशिरा करण्यात येते. अशावेळी मंडळ कृषि अधिकारी यांनी स्वत: शेताची पाहणी करुन शेतात पीक असल्याबाबत (पीकाचा व क्षेत्राचा उल्लेख करुन) प्रमाणपत्र द्यावे. पिकांची नोंद सुक्ष्म सिंचन संचाचे अनुदान अदा करण्यापूर्वी ७/१२ उता-यावर करुन घेऊन सुधारित ७/१२ उतारा मंडळ कृषि अधिकारी/तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे देण्याची जबाबदारी संबंधित शेतक-याची राहील. मात्र शेतक-याकडून सुधारीत ७/१२ उतारा प्राप्त झाल्यानंतर त्याची सत्यप्रत प्रस्तावाच्या स्थळप्रतीसोबत ठेवून ७/१२ उता-याची मूळप्रत मूळ प्रस्तावासोबत लावण्यासाठी व शेतक-याची अनुदानाबाबतची पुढील तातडीची कार्यवाही होण्यासाठी हा ७/१२ उतारा उप विभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. याशिवाय उता-यावर जेवढ्या क्षेत्राची नोंद संबंधित पिकाची असेल तेवढ्याच क्षेत्राचे अनुदान मंजूर करावे.

९. **तुषार सिंचन संचाच्या पाईपवर एम्बॉसींग**

तुषार सिंचन संच हा एका जागेवरुन दुसरीकडे सहज हलविता येण्यासारखा असतो. शेतक-यांकडून प्रत्यक्ष संचाची तपासणी करताना हा संच दुस-या शेतक-यांकडून आणला जाऊ नये व त्यामुळे एका संचावर दोन वेळा अनुदान दिले जाऊ नये म्हणून तुषार संचाचे पाईपच्या जोडावर, फिमेल पार्टवर एम्बॉसींग करुन पुढीलप्रमाणे मजकूर लिहावा **''शेतक-याचे नाव, गाव, संच बसविल्याचे वर्ष ''**. सदरचा मजकूर ठळकपणे व सहजपणे वाचता (normal eyesight) येईल असा सुस्पष्टपणे वितरकाकडून संच हस्तांतरीत करण्यापुर्वी कोरुन टाकण्यात यावा. कोरल्यानंतर त्यावर रंग द्यावा. मजकूर कोरतांना शक्यतो साधे मशीनद्वारे कोरावा. मजकूर सहजासहजी नष्ट होणार नाही अशा स्वरुपात असावा. हा मजकूर लिहिला आहे याबाबतची क्षेत्रीय अधिका-यांनी त्यांच्या मोका तपासणीच्या वेळी खात्री करावी व त्याची नोंद मोका तपासणी अहवालात घ्यावी. मोका तपासणीत वरीलप्रमाणे एम्बॉसींग आढळले नाही तर मोका तपासणी करणा-या अधिका-याने अशा संचाचे अनुदान अदा करू नये अशी शिफारस करावी. यानंतर एम्बॉसींग केल्याचा अहवाल संबंधित कृषि सहाय्यक यांनी दिल्यानंतर अनुदान अदा करण्याची शिफारस, मोका तपासणी करणा-या अधिका-याने फेर मोका तपासणी अंती करावी.

## ५.८ विविध लागवड अंतरावरील क्षेत्राकरीता खर्च मर्यादा व अनुदान मर्यादा.

### ५.८.१ ठिबक सिंचन संच -

ठिबक सिंचन संचासाठी वेगवेगळया ३ ते ४ लॅटरल अंतरांचे एकत्रीकरण करुन त्यांचे गट करण्यात आले आहे.एका लॅटरल अंतर गटातील सर्व लॅटरल अंतरासाठी अनुदान परिगणना करण्यासाठी शासनाने शासन निर्णय क्र.प्रकृसिं-२११६/प्र.क्र.१४०/४-अे,दि.१२/०८/२०१६ मधिल पृष्ठ क्र.७ वरील परिच्छेद-६ मध्ये नमुद केल्यानुसार केंद्र शासनाच्या www.agricoops.nic.in या संकेतस्थळावर निर्गमित केलेल्या राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत शेतावरील पाणी व्यवस्थापन या घटकाच्या मार्गदर्शक सुचनानुसार ठिबक सिंचन संच उभारणीच्या निर्धारीत केलेल्या किंमती पुढील प्रमाणे आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार निर्धारीत केलेल्या ठिबक सिंचन संच उभारणीच्या किंमती सन २०१६-१७ मध्ये अनुदान परिगणना करण्यासाठी अंतिम समजण्यात याव्यात.

Director Horticulture, M.S

सन २०१६-१७ साठी ठिबक सिंचन संचाचे अनुदान परिगणीत करण्यासाठी विविध लागवड क्षेत्राकरीता उभारणी खर्च मर्यादा.

| अ.क्र. | लॅटरल अंतर गट | १ हेक्टर | २ हेक्टर | ३ हेक्टर | ४ हेक्टर | ५ हेक्टर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८ मी. व त्यापेक्षा जास्त | २३५०० | ३८१०० | ५९००० | ७४१०० | ९४२०० |
| २ | ४ मी. ते ८ मी | ३३९०० | ५८१०० | ८९३०० | ११३२०० | १४२४०० |
| ३ | २ मी. ते ४ मी | ५८४०० | १०८००० | १६१८०० | २२०६०० | २७१५०० |
| ४ | १.२ मी. ते २ मी | ८५४०० | १६१३०० | २४३४०० | ३३२८०० | ४१२८०० |
| ५ | १.२ मी. पेक्षा कमी | १०००००० | १९३५०० | २९२१०० | ३९९४०० | ४९५४०० |

तथापि संच उभारणीचा खर्च यापेक्षा कमी/अधिक येऊ शकतो. एखाद्या लॅटरल अंतराचा ठिबक सिंचन संच उभारणीचा खर्च उपरोक्त प्रपत्रामधील संबंधित गटासाठी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा कमी असेल, तर ठिबक सिंचन घटकांची खात्री करुन त्या रक्कमेवर अनुदानाची परिगणना करावी.तसेच एखाद्या लॅटरल अंतराचा ठिबक सिंचन संच उभारणीचा खर्च उपरोक्त प्रपत्रामधील संबंधित लॅटरल अंतर गटांसाठी विहीत केलेल्या खर्च मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर देयकातील घटकांची खात्री करुन अनुदानाची परिगणना उपरोक्त प्रपत्रामधील संबंधित लॅटरल अंतर गटांसाठी निर्धारीत केलेल्या संच उभारणीच्या खर्च मर्यादेतच करावी. थोडक्यात वितरकाने दिलेल्या बिलाची रक्कम, मोका तपासणीनुसार आलेला खर्च आणि उपरोक्त निर्धारित खर्च मर्यादा यापैकी जी कमी असेल ती रक्कम अनुदानासाठी अंतिम समजण्यात यावी. या अंतिम रकमेवर परिच्छेद क्र.२.५ मध्ये दिलेल्या टक्केवारीच्या मर्यादेत अनुदान देण्यात यावे.

### ५.८.२ विविध क्षेत्राकरीता बसविलेल्या ठिबक संचासाठी खर्च मर्यादा व अनुदान निश्चिती

सन २०१६-१७ साठी ठिबक सिंचन संचाचे १.००, २.००, ३.००, ४.०० व ५.०० हेक्टर क्षेत्रासाठी अनुदान परिगणीत करण्यासाठी संच उभारणे खर्च मर्यादा परिच्छेद क्र.५.८.१ प्रमाणे आहेत. मात्र यापेक्षा वेगळ्या क्षेत्राकरीता अनुदान परिगणीत करण्यासाठी खालील प्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

**उदा.** " ८ x ८ मी. " या लॅटरल अंतरासाठी १.४० हेक्टर ठिबक सिंचन संच बसविलेले असल्यास त्यासाठी निश्चित करावयाची खर्च मर्यादा व देय अनुदान याबाबतचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

- १.०० हेक्टर क्षेत्रावरील ठिबक सिंचनाकरीता दिलेली खर्च मर्यादा = रु. २३५००/-
- २.०० हेक्टर क्षेत्रावरील ठिबक सिंचनाकरीता दिलेली खर्च मर्यादा = रु ३८१००/-
- १.४० हे.क्षेत्रावरील ठिबक सिंचनाकरीता निश्चित करावयाची खर्च मर्यादा पुढील प्रमाणे राहिल.

१. १.०० हेक्टर व २.०० हेक्टर क्षेत्रामधील खर्च मर्यादेतील फरक रु. ३८१००-२३५०० = रु १४६००/-

२. १.०० हे. व २.०० हे. क्षेत्रातील फरक = १०० गुंठे

३. प्रति गुंठा खर्च मर्यादेतील फरकाची रक्कम रु. १४६०० भागिले रु १०० = रु १४६.०० प्रति गुंठा

४. या प्रमाणे ४० गुंठे क्षेत्रासाठी येणारी फरकाची रक्कम : १४६.०० x ४० = रु.५८४०/-

५. या प्रमाणे १.४० हे. क्षेत्रासाठी येणारी रक्कम १.०० हेक्टरची खर्च मर्यादा + ४० गुंठे क्षेत्रासाठी येणारी रक्कम . म्हणजेच रु. २३५०० + रु.५८४०/- = रु. २९३४०/-

६. वरीलप्रमाणे १.४० हेक्टर क्षेत्रावर बसविलेल्या ठिबक सिंचनासाठी येणारी खर्च मर्यादा रुपये २९३४०/- इतकी राहिल.

Director, Horticulture, M.S

७. १.४० हेक्टर करीता ६० टक्के दराने येणारे अनुदान रु २९३४० x ०.६० = रु. १७६०४/-

८. १.४० हेक्टर करीता ४५ टक्के दराने अनुदान रु २९३४० x ०.४५ = १३२०३/-

वर स्पष्ट केल्यानुसार विविध लॅटरल अंतरासाठी व विविध क्षेत्रासाठी बसविलेल्या ठिबक सिंचन संचाची मर्यादा व अनुदान रक्कम परिगणीत करण्यात यावी.

### ५.८.३ तुषार सिंचन संच -

सन २०१६-१७ या वर्षासाठी तुषार सिंचन संचासाठी केंद्र शासनाच्या www.agricoops.nic.in या संकेतस्थळावर निर्गमित केलेल्या राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत शेतावरील पाणी व्यवस्थापन या घटकाच्या मार्गदर्शक सुचनानुसार खालील प्रमाणे संच उभारणीच्या किंमती निर्धारीत केलेल्या आहेत. सदर शासन सदर मार्गदर्शक सूचनानुसार तुषार सिंचन संच उभारणीच्या निर्धारीत केलेल्या किंमती सन २०१६-१७ मध्ये अनुदान परिगणना करण्यासाठी अंतिम समजण्यात याव्यात.

अनुदान परिगणतेसाठी तुषार सिंचन संच उभारणीसाठी प्रति हेक्टरी खर्च मर्यादा (रुपये)

**चल स्प्रिंकलर (पोर्टेबल)**

| क्षेत्र (हे) | ६३ मी.मी. | ७५ मी.मी. | ९० मी.मी. |
|---|---|---|---|
| ०.४ हे .पर्यंत | ११९३० | लागू नाही | लागू नाही |
| ०.४० ते १.०० हे. | १९६०० | २२५५२ | लागू नाही |
| १.०० ते २.०० हे. | २८१०७ | ३२३०५ | लागू नाही |
| २.०० ते ३.०० हे. | लागू नाही | लागू नाही | ४२४५५ |
| ३.०० ते ४.०० हे. | लागू नाही | लागू नाही | ५३६४७ |
| ४.०० ते ५.०० हे. | लागू नाही | लागू नाही | ६०६३१ |

**सेमी पर्मनंट इरिगेशन सिस्टीम**

| **क्षेत्र** (हे) | **खर्च मर्यादा** (रुपये) |
|---|---|
| ०.४ हे .पर्यंत | २२५५३ |
| ०.४० ते १.०० हे . | ३६६०० |
| १.०० ते २.०० हे . | ६९७९१ |
| २.०० ते ३.०० हे . | ९४२०१ |
| ३.०० ते ४.०० हे . | १२०३७० |
| ४.०० ते ५.०० हे . | १४६०२६ |

**मिनी स्प्रिंकलर व मायक्रो स्प्रिंकलर**

| क्षेत्र (हे) | मायक्रो स्प्रिंकलर अंतर ५ x ५ मी. | मिनी स्प्रिंकलर अंतर १० x १० मी. |
|---|---|---|
| ०.२० | १९५६१ | लागू नाही |
| ०.४० | २९५९७ | ४१३५८ |
| १.०० | ५८९०० | ८५२०० |
| २.०० | १०३५२५ | १५९९९२ |
| ३.०० | १४९२२४ | २४२९४९ |
| ४.०० | २०१५०४ | ३१२७०९ |
| ५.०० | २५४७३५ | ३८३०७१ |

Director, Horticulture M.S

**लार्ज व्हालूम स्प्रिंकलर इरिगेशन सिस्टीम (रेनगन)**

| क्षेत्र (हे) | ६३ मी.मी. | ७५ मी.मी. | ९० मी.मी. |
|---|---|---|---|
| ०.४० ते १.०० हे . | ३१६०० | ३७३०३ | लागू नाही |
| १.०० ते २.०० हे . | लागू नाही | ४७३२७ | लागू नाही |
| २.०० ते ३.०० हे . | लागू नाही | लागू नाही | ६७२६० |
| ३.०० ते ४.०० हे . | लागू नाही | लागू नाही | ७७९६० |
| ४.०० ते ५.०० हे . | लागू नाही | लागू नाही | ८५६१४ |

संच उभारणीचा खर्च यापेक्षा कमी अधिक येऊ शकतो. ज्या ठिकाणी तुषार सिंचन संच उभारणीचा खर्च उपरोक्त प्रपत्रामधील क्षेत्रनिहाय विहित केलेल्या खर्च मर्यादेपेक्षा कमी असेल, तर तुषार सिचन संचाच्या घटकांची खात्री करुन त्या रक्कमेवर अनुदानाची परिगणना करावी.तसेच तुषार सिंचन संच उभारणीचा खर्च उपरोक्त प्रपत्रामधील क्षेत्रनिहाय विहीत केलेल्या खर्च मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर अनुदानाची परिगणना उपरोक्त प्रपत्रामधील क्षेत्रनिहाय विहीत केलेल्या खर्च मर्यादेनुसार करावी. थोडक्यात वितरकाने दिलेल्या बिलाची रक्कम, मोका तपासणीनुसार आलेला खर्च आणि उपरोक्त निर्धारित खर्च मर्यादा यापैकी जी कमी असेल ती रक्कम अनुदानासाठी अंतिम समजण्यात यावी. या अंतिम रकमेवर परिच्छेद क्र.२.५ मध्ये दिलेल्या टक्केवारीच्या मर्यादेत अनुदान देण्यात यावे.

**५.८.४** कृषि आयुक्तालयाने सन २०१६-१७ साठी प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने जिल्ह्यांना लक्षांक निश्चित करून दिले आहेत. ***तथापी प्रत्यक्ष निधी उपलब्ध झाल्याशिवाय पुर्वसंमती पत्र देण्यात येवू नयेत.*** कृषि आयुक्तालय स्तरावरुन निधी उपलब्ध होताच त्यानुसार वेळोवेळी कळविण्यात येईल. निधीच्या उपलब्धतेबाबत कळविल्या नंतरच जिल्हास्तरावरून तालुक्यास लक्षांक निश्चित करून द्यावा. ***तालुका कृषि अधिकारी यांनी प्रत्यक्षात उपलब्ध झालेल्या निधीनुसार दिलेल्या लक्षांकाच्या मर्यादेतच पुर्वसंमती पत्रे द्यावीत.***

**५.८.५** जिल्ह्याला उपलब्ध करून दिलेल्या आर्थिक उद्दीष्टांनुसार ***प्रत्यक्षात उपलब्ध करुन दिलेल्या*** निधीच्या मर्यादेतच सुक्ष्म सिंचन संचांना मान्यता देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या उपलब्ध अनुदानापेक्षा जास्त रकमेच्या प्रस्तावांना मान्यता देवून अतिरिक्त दायित्व निर्माण करु नये. आर्थिक वर्षात पुर्व मान्यता दिलेले प्रस्ताव प्रलंबित राहिल्यास संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

**५.९. माती व पाणी परिक्षण -**

सुक्ष्म सिंचन अभियानंतर्गत माती व पाणी परिक्षण हा घटक अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे या बाबतचे अहवाल अत्यंत खात्रीदायक असावेत. या साठी पुढील मृद चाचणी प्रयोगशाळांची माती व पाणी तपासणी अहवाल ग्राहय धरण्यात यावेत.

१. जिल्हा मृद चाचणी प्रयोगशाळा
२. कृषि विद्यापीठांकडील प्रयोग शाळा
३. कृषि विज्ञान केंद्रांकडील प्रयोग शाळा
४. सहकारी संस्थांकडील प्रयोग शाळा
५. शासनामार्फत मृद आरोग्य अभियानांतर्गत अनुदान दिलेल्या मृद चाचणी प्रयोगशाळा.
६. साखर कारखान्याच्या मृद चाचणी प्रयोगशाळा.
७. शासकीय व खाजगी कृषि महाविद्यालयाच्या प्रयोगशाळा.
८. मृद व पाणी परिक्षणाच्या सुविधा उपलब्ध असलेल्या खत कंपन्यांच्या प्रयोगशाळा.
९. मानव विकास अभियानांतर्गत उभारणी करण्यात आलेल्या प्रयोगशाळा.

माती व पाणी तपासणी अहवालाच्या छायांकित प्रती आणि खाडाखोड असलेले परीक्षण अहवाल ग्राह्य धरण्यात येवू नयेत.

Director Horticulture MS

### ५.१० सुक्ष्म सिंचन उत्पादकाबाबत

सुक्ष्म सिंचन संचाच्या उत्पादकांना कृषि आयुक्तालयामार्फत करारनामा करुन मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही सुरु आहे. कृषि आयुक्तालयस्तरावरुन उत्पादक नोंदणी झाल्यानंतर जिल्हास्तरावरुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून वितरकांना स्वतंत्ररित्या मान्यता दिली जाईल. त्यानुसार याबाबतची माहिती कृषि विभागाच्या संकेत स्थळावरील ई-ठिबक अज्ञावलीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

मान्यताप्राप्त उत्पादक तसेच वितरकाने योग्य काम न केल्यास किंवा काही गैरप्रकार / अनियमितता झाल्यास शासनावर / शेतक-यावर नुकसानाची वेळ येते. यासाठी उत्पादकाकडून ठिबक सिंचनासाठी रु.२.०० लक्ष व तुषार सिंचनासाठी रु.१.०० लक्ष आणि वितरकाकडून रु.१०,००० रकमेची बँक गॅरंटी घेण्यात येईल.

वितरकाने सुक्ष्म सिंचन कार्यक्रम राबविण्यासाठी कृषि विभागातील अधिकारी / कर्मचा-यांना आवश्यक सहकार्य करणे, वेळोवेळी लेखी मागीतलेली माहिती तसेच सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या बिलाच्या स्वाक्षरीत / छायांकित प्रती व इतर आवश्यक कागदपत्रे वितरकाने विहीत मुदतीत देणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. सदरची माहिती मागीतल्यानुसार व विहीत मुदतीत न दिल्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडून त्यांची नोंदणी रद्द करण्यात येईल तसेच पुढील आर्थिक वर्षात त्यांची नोंदणी/नुतनीकरण केले जाणार नाही.

### ५.१०.१ सुक्ष्म सिंचन घटकनिहाय कमाल विक्री दर

केंद्र शासनाचे पत्र क्र. F.NO ११-३७/२०१४- Hort दि.१४/८/२०१४ मुद्दा क्र. २ मधील अट क्र. IV मध्ये उत्पादक कंपन्यांना नोंदणी प्राधिका-याकडे त्यांची स्वतःची दर प्रणाली सादर करणे बंधनकारक राहिल व त्यानुसार त्यांना बिलींग करण्यास अनुमती देण्यात यावी असे नमुद केले आहे. त्याअनुषंगाने <u>शासनाने शासन निर्णय क्र.प्रकृसिं-२११६/प्र.क्र.१४०/४-अे,दि.१२/०८/२०१६ अन्वये सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांना स्वतःचे घटक निहाय दर आकारण्यास आणि त्यानुसार बिलिंग करण्यास मान्यता प्रदान केली आहे.</u> शासन निर्णयानुसार उत्पादक कंपन्यांना त्यांचे स्वतःचे दरपत्रक लागू करण्यास आणि त्यानुसार बिलींग करण्यास परवानगी देण्यात आली असल्याने सुक्ष्म सिंचन संच घटकांचे उत्पादक कंपनीनिहाय वेगवेगळे दर असतील आणि ते सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात व या योजनेतील पूर्व परवानगीने बसविण्यात आलेल्या संचासाठी तपासणी / शिफारस / मंजूर करणा-या अधिका-यांनी मान्य करावेत.

### ५.१०.२ सुक्ष्म संच घटकांचे बिल व बिलींग

**<u>ठिबक सिंचन संच</u> -**

१. केंद्र शासनाने दोन ओळी व दोन रोपांमधील अंतरासाठी क्षेत्रनिहाय ठिबक संचाच्या लॅटरलच्या अंतरानुसार क्षेत्रनिहाय संचासाठी सुचक साहित्य गरज (Indicative Material Requirement) ठरवुन दिलेली आहे. शक्यतो त्याप्रमाणे संच उभारणी करुन वितरकांनी शेतक-यांना बिल देणे अपेक्षित आहे. वितरकांनी शेतक-यांना पक्की बीले द्यावीत. तसेच कोरे चेक शेतक-यांकडुन घेऊ नयेत व आगाऊ कच्ची बिले शेतक-यांना देऊ नयेत. संचासाठी निर्धारीत केलेले साहित्याव्यतिरिक्त इतर बाबींच्या अथवा घटकांच्या किंमतींचा अंतर्भाव बिलात करु नये. ***<u>वाहतूक व जोडणी खर्च उत्पादक कंपन्यानी करावयाचा आहे</u>***. यासाठी कंपन्यानी किंवा वितरकांनी शेतक-यांकडून जास्तीची रक्कम घेवू नये.

२. बिलामध्ये प्रमुख घटकाचा (उदा. लॅटरल, पाईप, फिल्टर इ.) ***<u>बॅच नंबर नमूद</u>*** करणे आवश्यक आहे.

३. शासनाने निर्धारीत केलेल्या विविध लॅटरल अंतर गटांसाठी निश्चित केलेल्या संच उभारणी खर्च मर्यादेपेक्षा कमी किंमतीचे बील असेल, तर घटकांची खात्री करुन बिलाच्या रक्कमेवर अनुदानाची परिगणना

Director Horticulture.MS

करावी. मात्र विविध लॅटरल अंतर गटांसाठी निश्चित केलेल्या संच उभारणी खर्च मर्यादेपेक्षा जास्त किंमतीचे बील असेल, तर घटकांची खात्री करुन संबंधीत लॅटरल अंतर गटांसाठी शासनाने निर्धारीत केलेल्या संच उभारणी खर्च मर्यादा रक्कमेवर अनुदान परिगणना करावी. **कोणत्याही परिस्थितीत जास्तीचे अनुदान अदा होणार नाही याची दक्षता घ्यावी.**

**तुषार सिंचन संच -**

१. केंद्र शासनाने विविध घटकांचे निकष/मापदंड (Specification) दिली आहेत, त्याप्रमाणे सन २०१६-१७ या वर्षात तुषार सिंचन संचासाठी परिच्छेद ५.८.३ मध्ये दर्शविलेल्या संच उभारणीच्या किंमती निर्धारीत केलेल्या आहेत.

२. केंद्र शासनाने दिलेल्या खालील निकषांचे/गुणवत्तेचे (Specification) पाईप असतील याची खात्री करावी.

| अ. क्र. | पाईपचा व्यास मिमी | दाबाची क्षमता (किलो प्रती चौरस सें.मी ) | पाईपचा दर्जा |
|---|---|---|---|
| १ | ६३ | ३.२ | द्वितिय वर्ग |
| २ | ७५ | २.५ | प्रथम वर्ग |
| ३ | ९० | २.५ | प्रथम वर्ग |

## ५.११ अनुदान वितरणपूर्व व अनुदान वितरणानंतर क्षेत्रिय तपासणी

सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी तांत्रीक पध्दतीने झाली तसेच विहीत केलेल्या मानकांचे गुणवत्तेचे, विहीत मर्यादेत (Indicative Material Requirement) व बिलाप्रमाणे (Bill Of Quantity) संचाचे विविध घटक पुरविण्यात आले आहेत, याची तपासणी करुनच अनुदान वितरण व्हावे यासाठी कृषि सहाय्यकाने १०० टक्के तपासणी करावी. अनुदान मागणी प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी कार्यालयास प्राप्त झाल्यापासुन कृषि पर्यवेक्षक, मंडल कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांनी खालीलप्रमाणात **मोका तपासणी** मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अ.क्र.१० मधील नमूद कालावधीत करणे आवश्यक आहे. मोका तपासाणी अहवालावर लाभार्थिची / त्याच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली नाव नमूद करावे. तसेच अहवालासोबत सुक्ष्म सिंचन संच जोडणी दर्शविणारे शेताचे (शेतकरी किंवा त्याचे प्रतिनिधीसह) छायाचित्र जोडावे.

मोका तपासणी करण्यासाठी कृषि पर्यवेक्षक, मंडल कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांच्या कामाच्या व्याप्तीचा आढावा घेवून तालुका कृषि अधिकारी यांनी मोका तपासणीचे नियोजन करून मोका तपासणी या मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अ.क्र.१० मधील नमूद कालावधीत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून करुन घ्यावयाची आहे. यासाठी तालुका कृषि अधिकारी यांनी अनुदान मागणीचे अर्ज प्राप्त झाल्या बरोबर त्याची मोका तपासणी करण्यासाठी कृषि पर्यवेक्षक/मंडल कृषि अधिकारी/तालुका कृषि अधिकारी यांच्यापैकी कोण मोका तपासणी करणार याची निश्चिती करून तसे लेखी आदेश निर्गमित करावेत. मात्र असे आदेश निर्गमित करतांना शासन निर्णय दिनांक १२ ऑगस्ट २०१६ मधील तरतूदीनुसार खाली दर्शविलेल्या टक्केवारीत फारशी तफावत येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**मोका तपासणी**

| | | |
|---|---|---|
| कृषि सहाय्यक | - | १०० टक्के |
| कृषि पर्यवेक्षक | - | ५० टक्के |
| मंडल कृषि अधिकारी | - | ३० टक्के |
| तालुका कृषि अधिकारी | - | २० टक्के |

Director,Horticulture,M.S

**नियमीत तपासणी**

| | | |
|---|---|---|
| उपविभागीय कृषि अधिकारी | - | ३ टक्के |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - | १ टक्के |
| विभागीय कृषि सह संचालक | - | प्रतिमाह ५ संच |
| संचालक फलोत्पादन | - | प्रतिमाह १ संच |

**५.११.१ कृषि सहाय्यक -**

शेतक-यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर तसेच संचाची उभारणी झाल्यानंतर त्याची १०० टक्के तपासणी करावी. शेतक-याच्या अनुदान प्रस्तावांची छाननी करुन सर्व कागदपत्रे योग्य आहेत, याची खात्री करावी. उभारणी केलेल्या संचाना वितरकाकडून विक्री पश्चात सेवा दिली जाते यांची खात्री करावी. जर अशी सेवा दिली जात नसेल तर लेखी अहवाल मंडल कृषि अधिका-यामार्फत तालुका कृषि अधिकारी यांना सादर करावा. त्यानुसार त्यांनी पुढील कार्यवाही करावी.

**५.११.२ कृषि पर्यवेक्षक -**

शेतक-यांनी सुक्ष्म सिचंन संच बसवून अनुदान मिळणेकरीता सर्व कागदपत्रासह प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी कार्यालयात सादर केल्यानंतर कृषि पर्यवेक्षकांनी संबंधीत कृषि सहाय्यकांमार्फत अशा प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन सर्व कागदपत्रे योग्य आहेत, याची खात्री करावी. अपूर्ण प्रस्ताव शेतक-यांना उचित मार्गदर्शनासह परत करावेत. कृषि सहाय्यकाने तपासणी केलेल्या संचापैकी किमान ५० टक्के संचाची मोका तपासणी करावी. मोका तपासणीमध्ये डिसचार्ज व्हेरीएशन व प्रेशर व्हेरीएशन अनुक्रमे १० टक्के व २० टक्के या मर्यादेत असल्याची खात्री करावी. तसेच बिलाप्रमाणे संचातील घटक प्रत्यक्ष असल्याची खात्री करून तशी नोंद मोका तपासणी अहवालात करावी. मोका तपासणीचे प्रपत्र स्वतःचे हस्ताक्षरात भरावे. उभारणी केलेल्या संचाना वितरकांकडून विक्री पश्चात सेवा दिली जाते यांची खात्री करावी. जर अशी सेवा दिली जात नसेल तर लेखी अहवाल मंडल कृषि अधिका-यामार्फत तालुका कृषि अधिकारी यांना सादर करावा. नियमाप्रमाणे देय अनुदान नमूद करुन संच सुस्थितीत कार्यान्वीत असल्याबद्दल स्वाक्षरीसह प्रमाणपत्र (परिशिष्ट-९ ठिबक सिंचन संचासाठी, परिशिष्ट-१० तुषार सिंचन संचासाठी) शेतक-यांच्या प्रस्तावासोबत जोडून प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावा.

**५.११.३ मंडळ कृषि अधिकारी -**

शेतक-यांनी सुक्ष्म सिचंन संच बसवून अनुदान मिळणेकरीता सर्व कागदपत्रासह परिपुर्ण प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी कार्यालयात सादर केल्यानंतर संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांनी संबधीत कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक यांचेमार्फत अशा प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन प्रस्ताव परिपुर्ण व सर्व कागदपत्रे आहेत याची खात्री करावी. अपूर्ण प्रस्ताव शेतक-यांना उचित मार्गदर्शनासह परत करावेत व त्याची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवावी. पात्र प्रस्तावाची शिफारस तालुका कृषि अधिकारी कार्यालयास करावी. कृषि सहाय्यकाने तपासणी केलेल्या संचापैकी किमान ३० टक्के संचाची मोका तपासणी करावी.ही तपासणी कृषि पर्यवेक्षक यांनी केलेल्या तपासणी व्यतिरिक्त राहील. मोका तपासणीमध्ये डिसचार्ज व्हेरीएशन व प्रेशर व्हेरीएशन अनुक्रमे १० टक्के व २० टक्के या मर्यादेत असल्याची खात्री करावी. तसेच बिलाप्रमाणे संचातील घटक प्रत्यक्ष असल्याची खात्री करून तशी नोंद मोका तपासणी अहवालात करावी. मोका तपासणीचे प्रपत्र स्वतःचे हस्ताक्षरात भरावे. नियमाप्रमाणे देय अनुदान नमूद करुन संच सुस्थितीत कार्यान्वीत असल्याबद्दल स्वाक्षरीसह प्रमाणपत्र (परिशिष्ट-९ ठिबक सिंचन संचासाठी ,परिशिष्ट-१० तुषार सिंचन संचासाठी) शेतक-यांच्या प्रस्तावासोबत जोडून प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावा

Director,Horticulture,M.S

**५.११.४ तालुका कृषि अधिकारी -**

मंडळ कृषि अधिकारी यांचेकडून शिफारस होऊन आलेल्या अनुदान अदायगी प्रस्तावाची नोंद तालुका कृषि अधिकारी यांनी त्यांचेकडे असलेल्या नमुना रजिस्टर परिशिष्ट-७ मध्ये ठेवावी. या प्रकरणांची छाननी करुन कृषि सहाय्यकाने तपासणी केलेल्या संचापैकी २० टक्के संचाची मोका तपासणी करावी (सर्व मंडळातील बसविलेल्या संचाच्या प्रमाणात). ही तपासणी कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी यांनी केलेल्या तपासणी व्यतिरिक्त राहील. मोका तपासणीमध्ये डिसचार्ज व्हेरीएशन व प्रेशर व्हेरीएशन अनुक्रमे १० टक्के व २० टक्के या मर्यादेत असल्याची खात्री करावी.तसेच बिलाप्रमाणे संचातील घटक प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर बसविले असल्याची खात्री करून तशी नोंद मोका तपासणी अहवालात करावी. नियमाप्रमाणे देय अनुदान नमूद करुन संच सुस्थितीत कार्यान्वीत असल्याबद्दल स्वाक्षरीसह प्रमाणपत्र (परिशिष्ट-९ ठिबक सिंचन संचासाठी, परिशिष्ट-१० तुषार सिंचन संचासाठी) शेतक-यांच्या प्रस्तावासोबत जोडून अनुदान अदायगीसाठी शिफारशीसह सर्व प्रस्ताव ऑनलाइन प्रणालीद्वारे उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावेत.

उभारणी केलेल्या संचाची वितरकाकडून विक्री पश्चात सेवा दिली जाते यांची कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी यांचे मार्फत खात्री करावी. जर अशी सेवा दिली जात नसेल तर त्यांचे विरूध्द कार्यवाहीचा प्रस्ताव उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या मार्फत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावेत.त्यानुसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी.

**५.११.५ उपविभागीय कृषि अधिकारी -**

उपविभागीय कृषि अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी यांचेकडून सर्व प्राप्त प्रस्तावांची नोंद परिशिष्ट-७ नुसार त्यांच्या कार्यालयातील नोंदवहीत घेऊन सर्व प्रस्तावांची छाननी करावी. प्राप्त प्रस्तावापैकी ३ टक्के प्रस्तावांची तपासणी उपविभागीय कृषि अधिकारी यांनी करावयाची आहे. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी अनुदान योग्य प्रस्तावांची शिफारस जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे करावी व शेतकरी निहाय देय अनुदानाचा तपशील ऑनलाइन प्रणालीने सादर करावा. अनुदान मागणीचा नमूना सोबत परिशिष्ट-११ प्रमाणे राहील. याची एक प्रत संबंधीत तालुका कृषि अधिकारी कार्यालयास द्यावी.

**५.११.६ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी -**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभाग व तालुक्यातील कामाच्या प्रमाणात १ टक्के तपासणी करावयाची आहे.

उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडून अनुदान प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी परिच्छेद क्रमांक ५.५(७) मध्ये नमुद केल्याप्रमाणे योग्य ती मंजुरी देऊन अनुदान अदायगीची कार्यवाही या मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिशिष्ट "अ"मधील अ.क्र.१३ मधील नमूद कालावधीत पुर्ण करावी.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे जिल्हास्तरीय सूक्ष्म सिंचन समितीचे सचिव म्हणून कार्यरत राहतील. जिल्ह्याचा सूक्ष्म सिंचन आराखडा तयार करणे, अनुदानाकरीता आवश्यक तेवढी रक्कम उपलब्ध करुन घेणे, शेतक-यांना कर्ज उपलब्ध करुन घेण्यास मदत करणे, योजनेची अंमलबजावणी व संनियंत्रण करणे, मासिक अहवाल सादर करणे, निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे इत्यादी कामे त्यांनी करावयाची आहेत.

**५.११.७ विभागीय कृषि सहसंचालक -**

विभागीय कृषि सहसंचालक यांनी विभागातील प्राप्त प्रकरणांपैकी किमान ५ प्रकरणांची प्रतिमाह प्रत्यक्ष क्षेत्रिय भेटी देऊन तपासणी करावी. या योजनेचे संनियंत्रणासाठी उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे व कृषि आयुक्तालयास सादर करणे, सर्व नियतकालिक अहवाल वेळेवर सादर होतील याची दक्षता घेणे. अधिनस्त कर्मचारी / अधिका-याकडुन वेळेवर तपासणी व अनुदान अदायगी होते याचे संनियंत्रण करणे.

Director,Horticulture,MS

**५.११.८ तपासणी अहवाल -**

विभागीय कृषि सहसंचालक यांनी अधिनस्त सर्व कर्मचारी/अधिका-यांचे तपासणी अहवाल वेळेवर सादर होतील याचे संनियंत्रण व पाठपुरावा करावा. वरील मापदंडाप्रमाणे तपासणी करुन सर्व अधिकारी / कर्मचारी यांचा तपासणी अहवाल दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करावा. तपासणी अहवालाचा नमूना परिशिष्ट-१२ प्रमाणे असून तो सोबत जोडण्यात आलेला आहे. जे अधिकारी/कर्मचारी विहित मापदंडानुसार तपासणी करणार नाहीत त्यांच्यावर संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी योग्य ती प्रशासकिय कारवाई करावी.

**६.० विक्रीपश्चात सेवा केंद्रे -**

१. कृषि आयुक्तालयाकडे नोंदणी केलेल्या सुक्ष्म सिंचन संचाच्या उत्पादकांनी ज्या जिल्ह्यात त्यांनी विक्रीपश्चात सेवा केंद्रे सुरु केलेली आहेत अशा सर्व विक्रीपश्चात सेवा केंद्रांची नावे संपूर्ण पत्त्यासह संबंधित सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना कळवावीत. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी आयुक्तालयाने विहित केलेल्या परिशिष्ट-१३ नुसार सर्व विक्री पश्चात सेवा केंद्राची तपासणी करुन त्यांचा अहवाल विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करावा व त्याची प्रत कृषि आयुक्तालयास अर्ध शासकीय पत्राने सादर करावी.
२. मान्यताप्राप्त उत्पादकास नविन जिल्ह्यात किंवा जिल्हयात इतर ठिकाणी विक्री पश्चात सेवा केंद्र सुरु करावयाचे असल्यास सेवा केंद्र स्थापन करुन संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून तपासणी करुन घ्यावी तसेच त्याबाबतचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी विभागीय कृषि सहसंचालक व कृषि आयुक्तालयास सादर करावा.
३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी नवीन विक्रीपश्चात सेवा केंद्रांची १०० टक्के तपासणी करावयाची असून जुन्या विक्री पश्चात सेवा केंद्रांपैकी किमान १० टक्के सेवा केंद्रांची तपासणी अचानकपणे प्रती वर्षी करावयाची आहे. काही विक्री पश्चात सेवा केंद्रांची तपासणी अचानकपणे आयुक्तालय स्तरावरुन करण्यात येईल.
४. विक्री पश्चात सेवा केंद्रांवर अचानक तपासणीच्यावेळी अत्यंत गंभीर स्वरुपाच्या त्रूटी आढळल्यास संबंधित उत्पादकाचे नाव त्या जिल्हयापुरते मर्यादित मान्यता यादीतून वगळण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी योग्य त्या कारणमिमांसेसह विभागीय कृषि सहसंचालक यांच्या शिफारशीसह व त्यांचेमार्फत कृषि आयुक्तालयास सादर करावा.
५. उत्पादक कंपनीनिहाय सुरु करण्यात आलेल्या सर्व विक्रीपश्चात सेवा केंद्रांची माहिती स्वतंत्र नोंदवहीमध्ये जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी ठेऊन ती वेळोवेळी अद्यावत करावी.
६. जिल्ह्यामध्ये सुक्ष्म सिंचन संचाचे एकापेक्षा जास्त वितरक असतात. त्या सर्वांना विक्री पश्चात सेवा पुरविण्याची जबाबदारी विक्री पश्चात सेवा केंद्रावर राहील.
७. वितरक ज्या जिल्ह्यात काम करतो त्या जिल्ह्यात त्या उत्पादक कंपनीचे किमान एक व आवश्यकतेनुसार त्यापेक्षा जास्त विक्रीपश्चात सेवा केंद्र असणे बंधनकारक आहे, अन्यथा तो विक्रेता / कंपनी त्या जिल्ह्यात काम करण्यास पात्र राहणार नाही.

**६.१ विक्री पश्चात सेवा -**

**६.१.१ ठिबक सिंचन संच -**

शेतक-यांच्या शेतावर कंपनीमार्फत बसविलेल्या ठिबक सिंचन संचाच्या घटकामध्ये ३ वर्षाच्या कालावधीत काही उत्पादन दोष आढळून आल्यास तो सुस्थितीत करून देण्याची (Performance Warrantee) हमी ठिबक सिंचन संच उत्पादकांनी कृषि आयुक्तालयासोबत केलेल्या करारनाम्यात दिलेली आहे. वेगवेगळ्या स्तरावरील अधिकारी जेव्हा ठिबक संचाला भेटी देतात किंवा काही तक्रार प्रकरणी चौकशी होते, अशा प्रकरणी वरील दोन्ही अटींबाबत उत्पादक कंपनी दोषी आढळून येत असेल तर संबंधित अधिका-याने सदरच्या करारनाम्याचा वापर करुन शेतक-याला योग्य ती हमी/दुरुस्ती मिळवून देण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

Director,Horticulture,M.S

### ६.१.२ तुषार सिंचन संच :-

तुषार सिंचन संच उत्पादकांनी शेतक-यास संच कार्यरत राहण्यासाठी किमान तीन वर्षांची हमी (Performance Warrantee) दिली आहे. या कालावधीत उत्पादक/वितरक खालील बाबींवर त्यांच्या विक्रीपश्चात सेवा केंद्रामार्फत शेतक-यांना पहिल्या तीन वर्षापर्यंत मोफत सेवा देतील.

१. स्प्रिंकलर/नोझल यांचा दर्जा व कार्यक्षमता तपासणी करुन देणे व एक वर्षापर्यंत खराब झाल्यास पूर्ण बदलून देणे.
२. स्प्रिंकलरची स्प्रिंग ही योग्यरित्या कार्यान्वीत असल्याची खात्री करुन देणे.एक वर्षात खराब झाल्यास ती मोफत बदलून देणे.
३. हमी कालावधीत तुषार सिंचन संच सुरु असताना पाईपचे जोडनीतून पाणी गळती होणार नाही याची काळजी घेणे. पाणी गळती होत असल्यास ती बंद करुन देणे.
४. प्रेशर गेजचा वापर करुन योग्य क्षमतेचा संच कार्यान्वीत असल्याची खात्री करुन देणे.
५. तुषार सिंचन संचाबाबत मराठी मार्गदर्शक पुस्तिकेचा शेतक-यांना पुरवठा करणे.
६. शेतक-याच्या पिकासाठी आवश्यक असलेल्या पाण्याच्या गरजेप्रमाणे संच चालविण्याबाबत मार्गदर्शन करणे.
७. संबंधित वितरक/उत्पादक यांनी विक्रीपश्चात सेवा केंद्राचा पत्ता असलेल्या लेटरपॅडवर दूरध्वनीसह संपर्क साधण्यासाठी शेतक-यास कळविणे.

### ६.१.३ पोस्ट कार्डस् -

१. प्रत्येक सूक्ष्म सिंचन संचासोबत पुरवठादार/उत्पादक यांनी तीन पोस्ट कार्डस् पोस्टेज चार्जसहीत शेतक-यांना देण्याचे बंधनकारक करण्यात आलेले आहे. अशा पोस्टकार्डवर संबधीत जिल्हयाच्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाचा संपूर्ण पत्ता लिहिलेला/छापलेला असावा.
२. संच बसविल्यानंतर त्या संचासंबंधी काही तक्रारी असल्यास किंवा विक्री पश्चात सेवा शेतक-यांना वेळेवर उपलब्ध होत नसल्यास संबंधित शेतक-यांनी त्या कार्डवर तक्रारीबाबतचा मजकूर लिहून स्वतःचे स्वाक्षरीने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे पाठवावा.
३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे याबाबतची तक्रार प्राप्त होताच त्यांनी याबाबत वैयक्तिक लक्ष घालून तक्रारी संदर्भात संबंधित कंपनीच्या विक्री पश्चात सेवा केंद्रास अवगत करुन तक्रारीचे निवारण/ निराकरण करण्याबाबत कार्यवाही करावी.
४. तक्रारीची पूर्तता सात दिवसांच्या आत संबंधित विक्री पश्चात सेवा केंद्राने करुन देणे आवश्यक आहे.
५. सेवा केन्द्रास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी अवगत करुनही तक्रारीची दखल न घेता उचित कार्यवाही केली नाही, तर विभागीय कृषि सहसंचालक यांना कळवावे. मात्र अशा अहवालाची प्रत आयुक्तालयातील सूक्ष्म सिंचन कक्षास पाठवावी जेणेकरुन संबंधित कंपनीविरुध्द योग्य ती कारवाई करता येईल.विभागिय कृषि सहसंचालक यांनी सुध्दा त्यांच्या अभिप्रायासह कृषि आयुक्तालयास कळवावे.

### ६.१.४ सर्व्हिस कुपन्स -

१. शेतक-याकडे सुक्ष्म सिंचन संच बसविल्यानंतर पुरवठादाराने प्रथम तीन अल्कली/आम्ल प्रक्रियेच्या मोफत सेवा ठराविक कालावधीने पुरवावयाच्या आहेत.
२. शेतक-यांचा सूक्ष्म सिंचन संच कार्यान्वीत केल्यानंतर संबंधित शेतक-यास उत्पादक/वितरक यांनी तीन सर्व्हिस कुपन्स देणे बंधनकारक आहे. सर्वसाधारणपणे चार महिने संच कार्यान्वीत राहिल्यानंतर प्रक्रिया करणे अपेक्षित आहे.प्रत्येक प्रक्रियेच्यावेळी प्रक्रिया पूर्ण करुन विक्रीपश्चात सेवा केंद्राच्या तज्ञांनी दिनांकासह कुपन्सवर नोंद करुन स्वाक्षरी करावी आणि त्याची एक प्रत शेतक-याकडे ठेवावी, दुसरी प्रत विक्रीपश्चात सेवा केंद्रात जतन करुन ठेवावी. सर्वसाधारणपणे अशा प्रकारे तीन प्रक्रिया कराव्यात.

Director Horticulture,M.S

### ६.१.५. विक्री पश्चात सेवेचे सनियंत्रण -

१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कर्मचा-यांमार्फत कार्ड पध्दत व कुपन्स पध्दत याबाबत सविस्तर माहिती शेतक-यांना द्यावी. तसेच स्थानिक प्रसार माध्यमातुनही याबाबीस प्रसिध्दी द्यावी.

२. शेतक-यांना संचासोबत द्यावयाचे, महिती पुस्तिका, पोस्टकार्डस् व कुपन्स उत्पादकांनी आपल्या वितरकामार्फत उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

३. मागील वर्षी बसविलेल्या संचांसाठी याप्रकारे अल्कली/आम्ल प्रक्रिया करण्यात आली किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. सर्व पर्यवेक्षकीय अधिका-यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात बसविलेल्या संचाची तपासणी करताना आपल्या तपासणी अहवालात ही बाब नमूद करणे बंधन कारक राहील.

४. तीन वर्षापर्यन्त विक्री पश्चात सेवा देणे कंपनींवर बंधनकारक आहे. वितरकाने दुकानाबाहेर टोल फ्री नंबर (१८०० २३३ ४०००) लावावा, जेणे करुन लाभार्थी शेतक-यांना तक्रार करता येईल. विक्री पश्चात सेवा मिळत नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत विक्रेता, वितरक व कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी विभागीय कृषि सहसंचालक यांच्या मार्फत व त्यांच्या शिफारशीसह कृषि आयुक्तालयास सादर करावा.

### ७.० कंपनी व वितरकांना द्यावयाचा सुचना -

१. वितरकांनी साठा नोंदवही ठेवणे बंधनकारक आहे. वितरकाने साठा नोंदवही ठेवावी याबाबत सूचना दिलेल्या आहेत व त्याचा नमुना सुध्दा देण्यात आलेला आहे. वितरकांनी त्यांच्या स्तरावर ठेवलेली साठा नोंदवही ***तालुका कृषि अधिकारी व कंपनी प्रतिनिधी*** यांच्यांकडुन संयुक्तरित्या प्रमाणित करुन घ्यावी व त्यातच वितरकांनी नोंदी घ्याव्यात. वितरक साठा नोंदवही ठेवत नसल्याचे निदर्शास आले असून साठा नोंदवही न ठेवल्यामुळे गैरव्यवहारास वाव मिळतो ही अतिशय गंभीर बाब आहे. वितरकाने विहित नमुन्यात साठा नोंदवही ठेवून त्यात कंपनीने पुरविलेल्या घटकांची अद्यावत नोंद घेतल्याचे परिशिष्ट १४ प्रमाणे कंपनीच्या प्रतिनिधीने प्रमाणित करावे. (साठा नोंदवही संगणकामध्ये ठेवल्यास स्विकारली जाणार नाही) साठा नोंदवही ठेवल्या बाबतचा अहवाल दरमहा परिशिष्ट १५ मध्ये विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांना पाठवावा. कंपनीने जिल्हानिहाय साठा नोंदवही तपासणीसाठी कोणास प्राधिकृत केलेले आहे त्यांचे नाव व पदनाम कृषि आयुक्तालय, विभाग व जिल्हयास कळवावे.

२. तालुका कृषि अधिकारी व उप विभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व वितरकांच्या साठा नोंदवहीची तपासणी अनुक्रमे सहा महिन्यातून एकदा व वर्षातून एकदा करावी, तसेच साठा नोंदवही तपासले बाबत परिशिष्ट १६ प्रमाणे प्रमाणित करावे व तपासणीचा अहवाल परिशिष्ट १७ प्रमाणे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सह संचालक यांना सादर करावा व जिल्हानिहाय त्रैमासिक अहवाल विभागीय कृषि सह संचालक यांनी आयुक्तालयास सादर करावा.

३. शेतक-यांना देण्यात येणा-या बिलाच्या रोख पावतीवर शेतक-यांची / प्रतिनिधीची नावासह स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. वितरकांकडून शेतक-यांना बिलाची प्रत दिली जात नाही असे निदर्शनास आलेले आहे. बिलाची प्रत शेतक-यांना देवून बिलाच्या सर्व प्रतीवर शेतक-याच्या स्वाक्षरी घेऊन स्थळप्रतीवर त्यांना प्रत मिळाल्याची शेतक-यांची किंवा त्यांच्या प्रतिनिधीची नावासह स्वाक्षरी घेणे बंधनकारक आहे. तसेच सदरच्या बिलाच्या तीन प्रती करुन एक प्रत प्रस्तावासोबत जोडावी, एक प्रत शेतक-यास व एक प्रत वितरकने स्वतःच्या दप्तरी ठेवावी. स्वतःच्या प्रतीवर वितरकाने साहित्य ताब्यात मिळाल्याबाबत शेतक-याची नावासह स्वाक्षरी घ्यावी.

४. वितरकाने ठेवावयाच्या विविध नोंद वह्या. वितरकांच्या स्तरावर नोंदवह्या अद्यावत ठेवल्या जात नाहीत असे निदर्शनास आले आहे. खालीलप्रमाणे नोंदवह्या परिशिष्ट १८ मधील विहीत नमुन्यात ठेवाव्यात.या सर्व नोंदवह्या तालुका कृषि अधिका-यांकडुन प्रमाणित करुन घेऊन त्या वेळोवेळी अद्यावत कराव्यात.

१. साठा नोंदवही

२. सनियंत्रण नोंदवही.



Director, Horticulture, M.S

३. तक्रार निवारण नोंदवही.
४. अधिकारी भेट नोंदवही.

वितरकाकडे वरील प्रमाणे अभिलेख आढळून न आल्यास त्यांच्यावर जिल्हा/विभाग/आयुक्तालय/ शासन स्तरावरुन कारवाई करण्यात येईल. सुक्ष्म सिंचन योजनेत कुठल्याही प्रकारे गैरव्यवहार होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी वितरकांबरोबरच कंपनीची सुध्दा राहील.

५. वितरकांवर करावयाची कारवाई. वितरकाने प्रस्तावामध्ये चुकीची कागदपत्रे, एकाच लाभार्थ्याचे दुबार प्रस्ताव, मर्यादेपेक्षा जास्त प्रस्ताव, एकाच सर्व्हे नंबरचे दोन प्रस्ताव, संच न बसविता प्रस्ताव सादर करणे किंवा इतर काही गैरप्रकार केल्याचे निदर्शनास आल्यास वितरकावर खालीलप्रमाणे कारवाई जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्यामार्फत करण्यात यावी.
१. वितरकाची नोंदणी रद्द करणे.
२. वितरकाचे नाव काळ्या यादीत टाकणे.
३. भविष्यात त्या वितरकाच्या कुटुंबातील व्यक्तीस परत वितरक म्हणून न नेमने.
४. अनियमिततेचे स्वरुप पाहुन वितरकाविरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करणे.

६. कंपनीकडील मासिक अहवाल**.** कंपनीने उत्पादीत केलेल्या पी. व्ही. सी. पाईप, लॅटरल, ड्रिपर, इमिटींग पाईप, एच. डी. पी. ई. पाईप इत्यादी घटकांचा वितरकांना केलेल्या पुरवठ्याचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत आयुक्तालय, विभागीय कृषि सह संचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे खालील प्रपत्रात सादर करावा.

*वितरकास पुरवठा केलेल्या सुक्ष्म सिंचन घटकांचा अहवाल सादर करण्याचे प्रपत्र*

| अ.क्र. | जिल्हा | वितरकाचे नाव | बाब / घटक | युनिट (मिटर / संख्या) | परिमाण |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |

सदरहु अहवाल विहीत मुदतीत सादर न केल्यास संबंधित कंपनीवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

## ८.० गुणवत्ता नियंत्रण -

१. ठिबक/तुषार सिंचन संच घटकांचे साहित्य बी.आय.एस.(BIS) दर्जाचे असणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार उत्पादक व पुरवठादारास मान्यता देण्यात आली आहे. बीआयएस या संस्थेकडून प्रमाणपत्र धारकाचे नमुने घेतले जात असतात व गुणवत्ता नियंत्रणाची काळजी घेतली जाते.

२. कृषि विभागातील क्षेत्रिय अधिका-यांमार्फतसुध्दा नमुने काढून तपासणी करवून घेण्याची कार्यवाही गेल्या काही वर्षापासून सुरु आहे. त्यानुसार ठिबक/तुषार संचाच्या प्रमुख घटकांचे नमुने काढून ते तपासणीसाठी **सेंट्रल इनस्टीट्युट ऑफ प्लास्टीक्स इंजिनीअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी,प्लॉट न. जे-३/२ एमआयडीसी चिखलठाणा, औरंगाबाद ४३१००६.** या संस्थेकडे **सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी** पाठवून तपासून घ्यावेत. नमुने तपासणी शुल्क जिल्हास्तरावरील उपलब्ध अकस्मिक खर्च निधीतून अदा करण्यात यावे.

३. संच बसविल्यानंतर साधारणतः तक्रार असेल तर शेतक-याच्या शेतातून नमुना घ्यावा अन्यथा वितरक/ उत्पादक कंपनी यांच्या साठ्यातून पुढील प्रमाणात नमुने घ्यावेत.

जिल्ह्यामध्ये चालु आर्थिक वर्षात झालेला/ होणारा एकुण अनुदान खर्च विचारात घेवून नमुन्यांची संख्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी निश्चित करावी. रु.१ कोटी साठी १ नमुना या प्रमाणात नमुन्यांची संख्या निर्धारीत करून तालुक्यास अनुदान खर्चाच्या प्रमाणात लक्षांक निश्चित करून द्यावा. तालुकानिहाय लक्षांक निश्चित झाल्यानंतर मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी आणि उपविभागीय कृषि अधिकारी निहाय नमुने काढण्याचे उद्दीष्ट निश्चित करून द्यावे. लक्षांकाप्रमाणे अधिकारी निहाय नमुने काढण्याचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील. ज्या जिल्ह्यात रु. १ कोटी पेक्षा अनुदान खर्च कमी आहे. त्या जिल्ह्यात किमान एक नमुना उपविभागीय कृषि अधिकारी यांनी काढावा.

४. नमुना कोणी घ्यावा - कृषि विभागातील कृषि अधिकारी आणि त्यावरील सर्व अधिकारी हे नमुने घेण्यास सक्षम असतील.मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी यांनी संबधीत जिल्हा

Director Horticulture,M.S

अधिक्षक कृषि अधिकारी यांनी निश्चित केलेल्या लक्षांकानुसार नमुने घ्यावेत.(तसेच विभागिय स्तरावरील व आयुक्तस्तरावरील अधिकारीसुध्दा अपवादात्मक व आवश्यक परिस्थितीत नमुने घेऊ शकतील.)

५. नमुना कोठून घ्यावा - राज्यस्तरीय सूक्ष्म सिंचन समितीने ज्या उत्पादकांना मान्यता दिलेली आहे अशा उत्पादकांच्या कारखान्यातून/गोडावूनमधून/वितरकांकडून नमुने घेता येतील. मुख्यतः उत्पादकाकडून नमुना घेतेवेळी उपलब्ध असलेल्या वेगवेगळया लॉटची यादी मिळवावी व त्यामध्ये रॅन्डम पध्दतीने लॅाटमधून आवश्यक तेवढा नमुना उत्पादक कंपनी प्रतिनिधीच्या/विक्रीपश्चात सेवा केंद्राचे प्रमुख यांचे समक्ष घ्यावा व तो नमुना त्याचे समक्ष सीलबंद करावा. त्यावर संबंधित उत्पादकाच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी घ्यावी. कारखाना/गोडाऊन/वितरक यांच्याकडून दोन नमुने घ्यावेत. त्यातील एक नमुना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे तपासणीस पाठविण्यासाठी पाठवावा व एक नमुना नमुना काढणा-या अधिका-याने स्वतःकडे राखून ठेवावा.

६. मात्र जिल्हयातील सर्व कंपन्यांचा प्रत्येक घटकाचा प्रत्येक लॉट मधून किमान १ नमुना घेतला जाईल हे पहावे.

७. सेंट्रल इनस्टीट्युट ऑफ प्लास्टीक्स इंजिनीअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी,प्लॅाट न. जे-३/२ एमआयडीसी चिखलठाणा,औरंगाबाद ४३१००६ या संस्थेकडून नमूना तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर ***अप्रमाणित नमुन्यांचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संबंधित उत्पादक कंपनी / वितरक / नमुना घेणारा कर्मचारी / अधिकारी यांना व कृषि आयुक्तालयास एक महिन्याच्या आत उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.*** अशा अप्रमाणित नमुन्यांच्या बाबतीत संचालक फलोत्पादन यांच्याकडे सुनावणी घेऊन केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांच्या सुक्ष्म सिंचन संच उत्पादकावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

८. संचालक फलोत्पादन यांच्याकडे अप्रमाणित नमुन्यांच्या बाबतीत झालेल्या सुनावणीत खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

- नमुन्याच्या व उत्पादक कंपनीचा बॅच नंबर जुळत नाही.त्याची **काढलेला नमूना सील करण्यापुर्वी पिशवीत टाकावयाच्या प्रपत्रामध्ये (परिशिष्ट-२०) व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकरी यांना नमुना सादर करताना पत्रासोबत सादर करावयाच्या प्रपत्रामध्ये (परिशिष्ट-२१)** योग्य प्रकारे नोंद घेतली जात नाही.
- नमुना कोठून काढला त्याचा तपशील दिला जात नाही.
- क्षेत्रिय कर्मचारी/अधिकारी सुनावणीच्या वेळी माहितीसह उपस्थित राहत नाहीत.
- अनेक क्षेत्रिय कर्मचारी सुनावणीच्या वेळी उपस्थित राहत नाहीत.
- काढलेल्या नमुन्याचा बॅच क्रमांक नमुद केला जात नाही.

वरील बाबींची दखल घेऊन यापुढे संबंधित क्षेत्रिय कर्मचारी /अधिकारी यांनी सुनावणीसाठी संपुर्ण माहितीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

९. नमुना अप्रमाणित झाल्यावर सुनावणीच्या वेळी उत्पादक कंपन्याकडून फेरतपासणीची मागणी होते. तथापि अशा वेळी त्याच बॅचचा नमुना उपलब्ध होत नाही. त्यासाठी उत्पादक कंपन्यानी प्रत्येक बॅचचा एक संरक्षक नमुना (Guard sample) काढून त्यांचेकडे किमान तीन वर्षे जतन करुन ठेवावा.

### ८.१ शेतक-याच्या शेतावरुन नमुना काढण्याची पध्दत -

१. शेतक-याच्या शेतावर ठिबक/तुषार संच बसविलेनंतर काही शेतक-यांकडून तक्रारी प्रात होत असतात. तसेच ठिबक/तुषार संचाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी क्षेत्रिय अधिकारी क्षेत्रास भेट देत असतात. भेटीच्या वेळी किंवा तक्रारीची चौकशी करतेवेळी अधिका-यास जर एखाद्या शेतक-याकडे पुरविलेल्या ठिबक/तुषार सिंचन साहित्याबाबत शंका आली तर अशा शेतक-याकडील ठिबक/तुषार सिंचन संचाच्या घटकाचा एकच नमुना सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीच्या प्रतिनिधीसमोर घ्यावा. शेतातील नमूना काढण्यात येत आहे, ही बाब फार आधीपासून पुरवठादारास कळविण्यात येऊ नये. उत्पादक कंपनीचा प्रतिनिधी/विक्रीपश्चात सेवा केंद्राचा प्रमुख, नमूना काढताना उपस्थित नसल्यास व सदरचा नमूना हा शेतक-याच्या तक्रारीनुसार काढला जात असल्यास संबंधित शेतक-याच्या

Director Horticulture,M.S

गावातील एखाद्या प्रतिष्ठित नागरिकाच्या उपस्थितीत नमूना काढावा. असा नमूना काढल्यानंतर तो एका पिशवीमध्ये बंद करुन सील करावा व संबंधित शेतकरी/प्रतिष्ठित नागरिक यांची स्वाक्षरी घ्यावी.

२. तक्रारी व्यतिरीक्त इतर वेळेस शेतक-यांच्या शेतावर नमूना काढताना रॅन्डम पध्दतीचा अवलंब करावा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/उप विभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रातील ठिबक/तुषार संच बसविलेल्या शेतक-यांची यादी करावी. सदरची यादी कंपनीनिहाय असावी व या यादीतून रॅन्डम पध्दतीने शेतक-यांच्या नावाची निवड करावी व निवडलेल्या शेतक-याच्या शेतातील एकच नमूना काढावा. अशारितीने निवड करताना एकाच कंपनीचा नमुना घेणे ऐवजी वेगवेगळया कंपन्यांचे नमुने योग्य प्रमाणात घेतले जातील याची काळजी घ्यावी.घेतलेला नमूना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा. प्रत्येक घटकाचा नमूना किती असावा या विषयीची माहिती सोबतच्या परिशिष्ट-१९ मध्ये देण्यात आली आहे.

३. लॅटरलचे नमुने काढल्यानंतर त्याची योग्य गुंडाळी करावी. गुंडाळी करताना ते चेपले जाणार नाहीत अशा बेताने गोल गुंडाळी करावी व गोल गुंडाळी केल्यानंतर त्याला सुतळीने व्यवस्थीत बांधावे. सर्व बाजूने सुतळीने बांधल्यानंतर सुतळीच्या गाठीवर लाखेचे सील करावे. ड्रीपरचे नमुने शेतातून घेताना ते वेगवेगळ्या ठिकाणावरुन घेण्यात यावेत व घेतलेले नमुने कापडी पिशवीत घालून ती पिशवी सीलबंद करावी.

४. अशा रितीने सीलबंद केलेल्या पिशवीमध्ये सोबत जोडलेल्या परिशिष्ट-२० प्रमाणे माहितीपत्रक तयार करावे. सदरचे माहितीपत्रक नमूना सीलबंद करण्यापुर्वी कापडी पिशवीत टाकावे. त्या कापडी पिशवीस वरुन स्टेपल करावे व या दोन पिशव्या (लॅटरल/ड्रीपर) एका दुस-या मोठ्या पिशवीत टाकाव्यात व ही मोठी पिशवी व्यवस्थितरित्या शिवून सीलबंद करावी. सोबतच्या परिशिष्ट-२० मधील माहितीची एक प्रत, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास पाठविलेल्या पत्रासोबतसुध्दा जोडावी. शेतक-याच्या शेतातून काढलेला नमूना स्वच्छ धुवावा. असे नमुने शेतक-यांच्या शेतातून काढले याबाबतचा उल्लेख परिशिष्ट-२१ मध्ये करावा, म्हणजे तपासणी करताना संबंधित प्रयोगशाळा योग्य ती काळजी घेऊ शकेल.

५. शेतक-यांच्या शेतातून नमुना काढल्यानंतर शेतक-याचा संच बंद होणार नाही, याची शक्यतो काळजी घ्यावी. ज्या ठिकाणातून नमुने काढले असतील अशा ठिकाणी संबंधित वितरकाकडून नवे साहित्य बसवून घ्यावे व संच संबंधित वितरकाकडून तातडीने कार्यान्वीत करुन घ्यावा. नमूना काढलेल्या ठिकाणी पुन्हा साहित्य बसवून देण्याची जबाबदारी संबंधित वितरकाची राहिल.

६. नमूना काढल्यानंतर संबंधित अधिका-याने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे पाठवावेत. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास असे नमुने प्राप्त झाल्यानंतर त्याची नोंद परिशिष्ट-२२ प्रमाणे तयार करण्यात आलेल्या नोंदवहीत घ्यावी. उत्पादकांची नोंदणी झाल्यानंतर आयुक्तालयाकडून प्रत्येक घटकाचा सीएमएल नंबर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, यांना कळविण्यात येतो. नोंदवहीत नोंदी घेतांना काढलेल्या नमून्याचा सीएमएल नंबर आयुक्तालयाने कळविल्याप्रमाणेच आहे याची खात्री करुन घ्यावी. नमुन्याच्या पिशवीमधील परिशिष्ट-२० व फॉरवर्डींग लेटरनूसार प्राप्त झालेल्या परिशिष्ट-२१ मधील नमून्याचा तपशिल सारखाच आहे याची खात्री नोंदवहीत नोंद करण्यापूर्वी करावी.

७. नमूना प्राप्त झाल्यानंतर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी परिच्छेद क्र. ८(२) मध्ये दर्शविलेल्या प्रमाणे तपासणी संस्थेकडे नमुने पाठवून ते तपासून घ्यावेत व संस्थांची तपासणी फी या योजनेच्या त्यांना उपलब्ध करून दिलेल्या आकस्मीक निधीतून अदा करावी.

८. तपासाणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची प्रत अभिप्रायासह कृषि आयुक्तालयास पाठवावी. तसेच अप्रमाणीत नमुन्याचा सविस्तर अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संबंधित उत्पादक कंपनी /वितरक/ नमुना घेणारा कर्मचारी/ अधिकारी कृषि आयुक्तालयास पुढील कार्यवाहीस्तव सादर करावा.

## ९.० रॅण्डम पध्दतीने तपासणी -

### ९.१ आंतरविभागीय तपासणी

सुक्ष्म सिंचन योजनेतील गैरप्रकार रोखण्यासाठी विभागस्तरावर विशेष पथकांची स्थापना करून त्याच्यामार्फत क्षेत्रिय स्तरावर बसविलेल्या कमीत कमी ५ टक्के सुक्ष्म सिंचन संचाची आंतरविभागीय रॅण्डम पध्दतीने निवड करून तपासणी करण्याच्या निर्देश शासनाने दि.१२ ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयान्वये दिलेले आहेत.त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**९.१.१** राज्यातील एका विभागाने दुस-या विभागातील सुक्ष्म सिंचन संचाची आंतरविभागीय तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहे.त्यानुसार संबंधित विभागाने त्याच्यासमोर दर्शविलेल्या विभागाची तपासणी करावयाची आहे. ज्या विभागाची तपासणी करावयाची त्या विभागाच्या विभागीय कृषि सहसंचालकाने तपासणी पथकास सर्व अभिलेख उपलब्ध करून द्यावेत.तसेच संबंधित क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांना तपासणीसाठी उपस्थित राहण्याच्या सक्त सुचना द्याव्यात.

| अ. क्र. | ज्यांनी तपासणी करावयाची तो विभाग | ज्या विभागाची तपासणी करावयाची तो विभाग |
|---|---|---|
| १ | कोल्हापूर विभाग | ठाणे विभाग |
| २ | ठाणे विभाग | नाशिक विभाग |
| ३ | नाशिक विभाग | पुणे विभाग |
| ४ | लातूर विभाग | कोल्हापूर विभाग |
| ५ | पुणे विभाग | औरंगाबाद विभाग |
| ६ | नागपूर विभाग | लातूर विभाग |
| ७ | औरंगाबाद विभाग | अमरावती विभाग |
| ८ | अमरावती विभाग | नागपूर विभाग |

तपासणी करणा-या विभागाच्या विभागीय कृषि सहसंचालकाने,तपासणी करावयाच्या विभागातील विभागीय कृषि सहसंचालक यांचेशी संपर्क साधून त्यांच्या अधिनस्त असलेल्या प्रत्येक जिल्ह्यात सन २०१६-१७ मध्ये बसलेल्या एकूण संचांच्या ५ टक्के संच तपासणीचे नियोजन करावे.सदरची तपासणी दरमहा करुन मार्च २०१७ अखेर ५ टक्के संच तपासले जातील असे नियोजन करावे. ही तपासणी, तपासणी करावयाच्या विभागातील सर्व जिल्ह्यांत व सर्व तालुक्यात होईल आणि ती तेथे बसलेल्या संचाच्या प्रमाणात असेल याची खात्री करण्याची जबाबदारी तपासणी करणा-या विभागाच्या विभागीय कृषि सहसंचालक यांची राहिल.

**९.१.२** तपासणी पथक - प्रत्येक विभागात विभागिय कृषि सहसंचालक स्तरावर आंतरविभागीय तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे विशेष पथकांची स्थापना करण्यात यावी.

| अ.क्र. | तपासणी पथकातील सदस्य | तपशिल | सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १ | विभागीय/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | पथक प्रमुख | १ |
| २ | कृषि उपसंचालक/उप विभागीय कृषि अधिकारी | सदस्य | १ |
| ३ | तंत्र अधिकारी/तालुका कृषि अधिकारी | सदस्य | १ |
| ४ | मंडल कृषि अधिकारी/कृषि अधिकारी | सदस्य | १ |
| ५ | कृषि पर्यवेक्षक | सदस्य | १ |
| ६ | कृषि सहाय्यक | सदस्य | १ |

विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील ***अधिक्षक कृषि अधिकारी*** यांनी याआंतरविभागीय तपासणीचे नियोजन व संनियंत्रण करावे. विभागीय कृषि सहसंचालक यांनी क्षेत्रिय व कार्यलयीन कामकाजाचा अंदाज घेऊन तपासणी पथकातील सदस्यांची निवड करून तसे आदेश निर्गमित करावेत. तसेच तपासणी पथकास, ज्या विभागाची तपासणी करावयाची त्या विभागातील जिल्हा व तालुके निश्चित करून द्यावेत. तपासणी पथक नेमून दिलेल्या

Director, Horticulture, M.S

विभागात दरमहा तपासणीसाठी जाणार असल्याने पथकातील पथक प्रमुख व सदस्य कायम न ठेवता त्या त्या वेळच्या क्षेत्रिय व कार्यलयीन कामकाजाचा अंदाज घेऊन प्रत्येक महिन्यात बदलून देण्यात यावेत.

**९.१.३ तपासणीची कार्यवाही -** पथक प्रमुखाने त्यांनी नेमून दिलेल्या जिल्हा व तालुक्यातील सन २०१६-१७ मध्ये बसलेल्या एकूण संचांच्या ५ टक्के संच तपासणीची कार्यवाही करावी.यासाठी तालुक्यातील गावांची यादी आद्याक्षरांच्या क्रमाने तयार करावी व त्यातून रॅण्डम पध्दतीने गावांची निवड करावी. गावांची निवड झाल्यानंतर त्या गावातील सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या लाभार्थ्यांची यादी त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार क्रमाने तयार करून रॅण्डम पध्दतीने लाभार्थींची निवड करावी.निवडलेल्या लाभार्थीच्या संचाची परिशिष्ठ १२ अ मधील नमुन्यात तपासणी करावी. तपासणी पुर्ण झाल्यावर तपासणी अहवाल विभागिय कृषि सहसंचालक यांना आठ दिवसांच्या आत गाव व लाभार्थींच्या निवड प्रक्रियेसाठी वापरलेल्या रॅण्डम टेबलसह सादर करावा.तपासणी करताना मागील महिन्यात तपासणी पथकाने केलेल्या तपासणीतील संचाची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. पथक प्रमुखाने तपासणीत आढळून आलेल्या गंभीर त्रुटी/उणिवा/अनियमितता याबाबतची स्वतंत्र टिपणी अनुषंगीक अभिलेखासह तपासणी अहवालासोबत सादर करावी

विभागीय कृषि सह संचालक यांनी वेळोवेळी व वेगवेगळ्या तपासणी पथकांच्या तपासणी अहवालाचे संकलन करून संकलित अहवाल आपल्या अभिप्रायासह सविस्तर व स्वयंस्पष्ट अहवाल कृषि आयुक्तालयास दिनांक १५/४/२०१७ पर्यंत सादर करावा. तथापि तपासणीत गंभीर त्रुटी /उणिवा / अनियमितता आढळून आल्या तर त्याबाबतचा अहवाल तातडीने कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**९.१.४** सदर तपासणीसाठी आवश्यक असलेले वाहने भाडेतत्वावर उपलब्ध करून घ्यावेत व त्यासाठीचा खर्च या योजनेच्या त्यांना उपलब्ध करून दिलेल्या आकस्मीक निधीतून भागविण्यात यावा.

**९.२ कृषि आयुक्तालयस्तरावरील तपासणी -**

कृषि आयुक्तालयस्तरावरून देखिल प्रत्येक विभागातील सुक्ष्म सिंचन संचाची रॅंडम पध्दतीने तपासणी करण्यात येईल.यासाठीचे पथक खालील प्रमाणे राहिल.

| अ.क्र. | पदनाम | तपशील |
|---|---|---|
| १ | कृषि सहसंचालक(फलो) | पथक प्रमुख |
| २ | संबधित जिल्हयांचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य |
| ३ | कृषि उपसंचालक(फलो-४) | सदस्य |

सदर पथकाने वर्षात राज्यातील प्रत्येक विभागातील किमान एका सुक्ष्म सिंचन संचांची रॅंण्डम पध्दतीने निवड करून त्याची सखोल तपासणी करावी आणि त्याचा अहवाल त्या-त्या वेळी संचालक(फलो) यांना सादर करावा.

**१०.० प्रशिक्षण -**

क्षेत्रिय अधिकारी, कर्मचारी, शेतकरी व इतर संबंधितांना राज्यातील प्रिसिजन फार्मीग डेव्हलमेंट सेंटर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, यांचेमार्फत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाशी संबंधित शेतकरी, अधिकारी, उत्पादक, वितरक यांना प्रत्येक जिल्ह्यासाठी निश्चित केलेल्या संख्येनुसार सदर प्रशिक्षणासाठी पाठविणे आवश्यक आहे.

या प्रशिक्षणामुळे सर्व संबंधित घटकांची तांत्रिक क्षमता वाढीस लागेल. सदरचे प्रशिक्षण कार्यक्रम केंद्र शासनाच्या Horticulture Division, DAC आणि NCPAH यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येतील.

या प्रशिक्षणाशिवाय ठिबक/तुषार सिंचन संचाचे उत्पादक/वितरक यांनी प्रत्येक जिल्ह्यात ठिबक व तुषार सिंचन संच बसविलेल्या किंवा बसविण्यास उत्सूक असणा-या शेतक-यांचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करावयाचे आहेत. या प्रशिक्षणात संच उभारणी, पिकाची पाण्याची गरज, आम्ल विम्ल प्रक्रीया, देखभाल, दुरुस्ती, विक्रीपश्चात सेवा, शेतक-याने घ्यावयाची काळजी इ अनुषंगिक विषयांचा समावेश करावा.तसेच पाण्याचे परिणामकारक व्यवस्थापन, पीक व जमिनीचे व्यवस्थापन त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे. सदर

Director Hotriculture M.S

प्रशिक्षणवर्ग कृषि विद्यापिठ/आयसीएआर संस्था /कृषि विज्ञान केंद्रे/ आत्मा/नामांकित स्वयंसेवी संस्था यांच्या सल्ल्याने व सहकार्याने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कृषि विद्यापिठे, कृषि विज्ञान केंद्रे किंवा रामेती येथे आयोजित करावेत. प्रत्येक जिल्ह्यातील बहुतांशी अधिका-यांना ठिबक/तुषार बाबत विभागामार्फत प्रशिक्षण दिले आहे. त्यांच्या कौशल्याचा उपयोग या प्रशिक्षणासाठी करुन घ्यावा. प्रत्येक उत्पादकाने ते पुरवठा करित असलेल्या जिल्ह्यात वर्षातून किमान एक प्रशिक्षण वर्ग आयोजित करावा. प्रशिक्षण वर्गाचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी आयुक्तालयास पाठवावा.

**११.० मासिक प्रगती अहवाल -**

सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी विभागिय कृषि सहसंचालकांमार्फत सुक्ष्म सिंचन संच बसविल्याचा व खर्चाचा अहवाल विहीत प्रपत्रामध्ये दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत आयुक्तालयास सादर करावा. केंद्र शासनाचे मासिक प्रगती अहवालाचा नमुना सोबत परिशिष्ट-२३ मध्ये जोडण्यात आला आहे. मासिक प्रगती अहवाल मासिक खर्चाच्या अहवालाशी सुसंगत असला पाहिजे. कृषि आयुक्तालयस्तरावरुन योजनेचा सविस्तर त्रैमासिक अहवाल पुढील त्रैमासिकाच्या पहिल्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत त्याचप्रमाणे वार्षिक प्रगती अहवाल आर्थिक वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत कृषि व सहकार विभाग, कृषि मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे तसेच राज्य शासनाकडे सादर करावा.

**१२.० निधी -**

१. प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना,विदर्भ सघन सिंचन कार्यक्रम, ग्रामिण पायाभूत विकास निधी, राष्ट्रीय कृषि विकास योजना आणि इतर योजनांमधून सुक्ष्म सिंचन संचांसाठी दिलेल्या अनुदानासाठी स्वतंत्र लेखापुस्तक ठेवण्यात यावे.
२. अनुदानाच्या वितरणासाठी संचालक फलोत्पादन यांना शासनाने प्राधिकृत केले आहे.
३. डीपीसी अनुदानाच्या वितरणासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. शासन निर्णय क्र. जिवायो-१००७/प्र.क्र.३९/ का-१४४४, दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ नुसार त्यांनी सदर योजनेचा प्रतीमाही खर्चाचा तपशील व रोख प्रवाह (कॅश फ्लो) जिल्हाधिकारी यांच्याकडे नियमीत सादर करावा.
४.या योजनेचे सुधारीत अंदाजपत्रक (४/८/९/१० माही) जिल्हा नियोजन समितीस जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी वेळेत सादर करावे. यावर्षी केंद्र व राज्य हिश्श्याच्या अर्थसहाय्याचे प्रमाण ६० : ४० विचारात घेऊन या योजनेसाठी आवश्यक ती तरतूद जिल्हा नियोजन समितीमार्फत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करून घ्यावी.
५. केंद्र शासनाकडुन जिल्हयाच्या सुक्ष्म सिंचनाच्या मंजुर वार्षिक आराखडयांनुसार ५ टक्के, निधी प्रशासकीय खर्चासाठी उपलब्ध होणार आहे.

**१३.० उपयोगिता प्रमाणपत्र -**

१. प्राप्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी विभागीय कृषि सहसंचालक यांचे प्रतिस्वाक्षरीसह *आयुक्तालयास सादर करावे.* केंद्र शासनास सादर करण्यात येणारे आंग्लभाषिय उपयोगिता प्रमाणपत्र जीएफआर १९-अे नूसार सादर करण्यात यावे. या उपयोगिता प्रमाणपत्राचा नमूना सोबत परिशिष्ट-२४ मध्ये जोडण्यात आलेला आहे.
२. राज्य शासनास सादर करावयाच्या उपयोगीता प्रमाणपत्राचा नमुना परिशिष्ट-२४ प्रमाणे राहील. या प्रमाणपत्राच्या आधारे आयुक्तालयाकडून राज्याचे एकत्रित उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर करण्यात येईल.
३. उपलब्ध करुन दिलेला निधी तात्काळ खर्च करावा व त्याप्रमाणे उपयोगीता प्रमाणपत्र विहीत अहवालासह सादर करावे. हे उपयोगिता प्रमाणपत्र सादर झाल्याशिवाय पुढील निधी वितरीत केला जाणार नाही. हे प्रमाणपत्र

Director, Horticulture, M.S

देताना मासिक खर्चाचे विवरणपत्राशी पडताळून पहाण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक यांची राहील.यामध्ये तफावत राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

**१४.० लाभार्थी यादी -**

१४.१ आर्थिक वर्ष पूर्ण होताच योजने अंतर्गत लाभार्थी शेतक-यांची संगणकीकृत यादी विहित प्रपत्रात केंद्र शासनास सादर करावयाची आहे. केंद्र शासनाने विहित केलेल्या आंग्लभाषीय प्रपत्राचा नमूना सोबत परिशिष्ट-२५ प्रमाणे दिलेला आहे. सदर यादी मध्ये अनिसुचित जाती/अनुसुचित जमाती, महिला, अल्प व अत्यल्प भुधारक, व खुला प्रवर्ग असा स्पष्ट उल्लेख असावा. तयार करण्यात आलेली संगणकीकृत यादी विभागाच्या वेबसाईटवर टाकावी.

१४.२ तालुका कृषि अधिकारी यांनी मराठी भाषेतील लाभार्थीची यादी व त्यांना देण्यात आलेले अनुदान याबाबतची माहिती योजना राबविलेल्या गावामध्ये ग्रामपंचायतीच्या फलकावर दर्शनी भागात लावण्याच्या सुचना सर्व कृषि पर्यवेक्षकांना द्याव्यात व त्यासाठी लाभार्थीची गावनिहाय यादी सर्व कृषि पर्यवेक्षक यांनी तालुका कृषि अधिकारी कार्यालयामधून उपलब्ध करून घ्यावी.

**१५.० लेखा परिक्षीत उपयोगिता प्रमाणपत्र -**

योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या निधीचे लेखा परिक्षीत उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक वर्ष पूर्ण होताच केंद्र शासनास सादर करावयाचे आहे. याकरीता जिल्हास्तरावरुन योजनेतील जमा-खर्चाचे सविस्तर लेखा परिक्षण करण्यासाठी आवश्यकते अभिलेख वेळो वेळी अद्ययावत करण्याबाबत दक्षता घ्यावी. सन २०१५-१६ या वर्षामधिल लेखांकन व लेखापरीक्षण करण्यासाठी अवलंबिलेल्या कार्यपध्दतीनुसार स्वतंत्र सनदी लेखापालाची नियुक्त जिल्हास्तरावरुन करुन सन २०१६-१७ जिल्हास्तरावरील लेखे तपासणी / लेखा परिक्षण करून घेवून केंद्र व राज्य हिस्सा निधीचे लेखा परिक्षीत उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व सनदिलेखापालांच्या संयुक्त स्वाक्षरीने आयुक्तालयास सादर करावे. याकरीता येणारा खर्च योजनेसाठी प्राप्त आकस्मिक निधीमधून भागविण्यात यावा.

याशिवाय केंद्र/राज्य/महालेखापाल यांच्या लेखापरिक्षण अहवालातील लेखा आक्षेपांची विहीत मुदतीत पुर्तता करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहिल.सदरच्या सुचना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निर्गमीत करण्यात येत असून योजनेची अंमबजावणी करतांना अडचणी निर्माण झाल्यास केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना अंतीम समजण्यात याव्यात.या सर्व मार्गदर्शक सुचना केंद्र शासन,राज्य शासन निर्णयांच्या व वेळोवेळी दिलेल्या पत्राच्या अधीन राहून निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.यामध्ये काही शंका, अडचणी व इतर काही मुद्दे उपस्थित झाल्यास मूळ शासन निर्णय,पत्र,सुचना इ.अंतिम राहतील त्यानुसार कार्यवाही करावी व त्यांचाही योजना राबविताना विचार करावा.

**मा. आयुक्त कृषि यांच्या मान्यतेने**

**संचालक,फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५

Director,Horticulture,M.S

## परिशिष्ट - अ

## सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाही | संबंधित अधिकारी | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | क्षेत्रिय स्तरावर योजना राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे व जिल्हयांना लक्षांक ठरवून देणे. | संचालक (फलोत्पादन) | प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ५ दिवसात. |
| २. | शेतक-यांकडून अर्ज स्विकारणे. | तालुका कृषि अधिकारी | कृषि आयुक्तालयाकडून मार्गदर्शक सूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकपासून ३० दिवसाच्या कालावधीपर्यंत. |
| ३. | अर्जाची छाननीकरणे. | तालुका कृषि अधिकारी | अर्ज प्राप्त झाल्यापासून १० दिवासात. |
| ३.(अ) | त्रुटी पत्रक बजावणे | तालुका कृषि अधिकारी | पुढील ५ दिवसात |
| ४. | अर्जात काही त्रुटि असल्यास त्याबाबतची पुर्तता अर्जदाराकडून करुन घेणे | तालुका कृषि अधिकारी | १० दिवसाच्या कालावधीत. |
| ४.(अ) | पात्र लाभार्थी जाहीर करण्याकरिता जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-यांच्या कार्यायास अग्रेषित करणे | तालुका कृषि अधिकारी | पुढील २ दिवसात |
| ४.(ब) | जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-यांनी पात्र लाभार्थ्यांची यादी जाहीर करणे. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | पुढील ३ दिवसात |
| ५ | कृषि आयुक्तालयाकडून विभागीय कृषि सहसंचालकांना अनुदानाचे वाटप करणे. | संचालक (फलोत्पादन) | शासनाकडून अनुदान वितरीत झाल्यानंतर २ दिवसात. |
| ६ | विभागीय सहसंचालकानी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना अनुदानाचे वाटप. | विभागीय कृषि सह संचालक | कृषि आयुक्तालयाकडून अनुदान वितरीत झाल्यानंतर २ दिवसात. |
| ७ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी यांना आर्थिक लंक्षाक निर्धारीत करुन देणे. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | विभागीय कृषि सहसंचालकाकडून अनुदानाचे वाटप झाल्यानंतर २ दिवसात. |
| ८ | अर्जदारास पूर्व मान्यता कळविणे. | तालुका कृषि अधिकारी | लक्षांक प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ४ दिवस. |
| ९ | अर्जदाराने सूक्ष्म सिंचन संचाची उभारणी करणे | शेतकरी | पूर्व मान्यता प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात सूक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठीचा प्रस्ताव तालुका कृषी अधिका-याकडे सादर करणे. |

Director Horticulture,M.S

| अ.क्र. | कार्यवाही | संबंधित अधिकारी | कालावधी |
|---|---|---|---|
